प्रकरण तिसरे

# ‘जोहड’ मधील व्यक्तिरेखा

प्रास्ताविक
‘जोहड’ मधील व्यक्तिरेखा
१. राजेंद्रसिंह
२. कजौडी
३. किशन
४. दडकीमाई
५. गोपाल
६. मांगू पटेल
७. झुमा
८. माधो
९. जयराम मीणा
१०. प्रेमली
११. नादानसिंह
१२. जोधपूरचे महाराजा गजसिंह
इतर व्यक्तिरेखा
१. जंबुरी
२. राजेंद्रसिंहांचे वडील
३. रामकली
४. रामजी
५. रामप्यारी
६. राजेंद्रसिंहांची पत्नी मीना
७. राजेंद्रसिंहांची मुलगी रेणू
८. दाखडी
९. जयरामची आई
१०. सुलेमान
११. बन्सीचाचा
१२. हरिरामजी
१३. राधू पटेल
समारोप
संदर्भ

प्रकरण तिसरे

# 'जोहड'मधील व्यक्तिरेखा

**प्रास्ताविक :**

व्यक्तिरेखा हा कादंबरीचा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. कादंबरीतील व्यक्तिरेखा जितक्या विकसनशील असतील तितके कादंबरीचे यश मोठे असते. कथानकाला गतिमान करण्याचे काम कादंबरीतील पात्रे करत असतात. पात्रांमुळेच कथानकाला चैतन्य प्राप्त होत असते.

वाङ्मयातील व्यक्तींच्या स्वभावावर, गुणवैशिष्ट्यांवर प्रकाश टाकणे म्हणजे त्या व्यक्तिंचे किंवा पात्रांचे दर्शन घडविणे होय. त्या व्यक्तिंचा राग, लोभ, हर्ष, खेद या भावना यात येतात. पूर्वीच्या कादंबरीकारांच्या व्यक्तिरेखा या बाह्यरूप वर्णन किंवा देहाचे वर्णन असलेल्या आढळतात. कादंबरीतील व्यक्तिरेखा या स्थिर नसून विकसनशील राहिल्या पाहिजेत असा आग्रह नंतरच्या काळात रुढ झाला. त्यामुळे कादंबरीतील व्यक्तिरेखा जास्तीत जास्त विकसनशील ठेवण्याचा प्रयत्न कादंबरीकार करू लागले. कादंबरीतील व्यक्तिरेखा जिवंत व विकसनशील असतील तितके जीवनदर्शन वास्तवपूर्ण होत जाते. कादंबरीचा रूपविचार या काळातच अधिक गांभिर्याने केला जाऊ लागला.

कादंबरीकार कादंबरी लिहित असल्याने त्यांना स्वत: निर्मिलेल्या पात्रांची माहिती असते. तसेच पात्रांच्या स्वभावांतील विविध छटा तो प्रतिभेच्या साह्याने निर्माण करीत असतो. निरनिराळ्या प्रसंगी पात्रांच्या भावना काय असतील याचा अंदाज लेखक घेत असतो. यामुळे पात्रे जिवंत वाटतात. या दृष्टिने 'जोहड'मधील व्यक्तिरेखा अभ्यासता येतील.

**'जोहड'मधील व्यक्तिरेखा :**

लेखिका सुरेखा शहा यांनी 'जोहड' या कादंबरीची निर्मिती केली आह. यात एका महान व्यक्तीच्या आयुष्यातील कर्तृत्वाची दखल त्यांनी घेतली आहे. सुरेखा शहांच्या लेखनाविषयी सुनीता म्हणतात की, "... घनघोर स्वार्थी समय में एक ऐसे जलनायक के

जीवन-संघर्ष को इतने सहज और पारदर्शी ढंग से प्रस्तुत किया है कि हम राजेंद्रसिंह के जीवन के आरपार देख सकते है ।'' [१]

'जोहड' ही कादंबरी राजेंद्रसिंहांच्या जीवनकार्यावर आधारलेली असली तरी सुरेखा शहा यांनी या कादंबरीत इतर व्यक्तिरेखाही उल्लेखनीय स्वरूपात मांडल्या आहेत. यापूर्वीच्या प्रकरणात 'जोहड' या चरित कादंबरीच्या आशयसूत्रांचा अभ्यास केला. प्रस्तुत प्रकरणात 'जोहड' मधील व्यक्तिरेखा पाहता येतील. सर्वप्रथम राजेंद्रसिंहांची व्यक्तिरेखा पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**राजेंद्रसिंह**

'जोहड' ही कादंबरी राजेंद्रसिंहांची चरित्र कहाणी बनून येते. त्यांच्या जीवनाचा लढा अधोरेखित करते. राजेंद्रसिंह हे मूळचे मेरठ जवळील 'दौसा' या गावचे. 'दौसा' या गावच्या जमीनदाराचा मुलगा म्हणजे राजेंद्रसिंह. त्याच्या वडिलांचा स्वभाव अतिशय तापट व तऱ्हेखोर होता. गावची जमीनदारी त्यांच्याकडे असल्याने कुळांना ते फार त्रास देत. त्यांना नेहमी अपमानास्पद बोलत. ते राजेंद्रसिंहांना पहावत नसे. कुळांना दुसरा कोणताही मार्ग नसल्याने लाचारी सहन करून ते त्यांच्याकडेच काम करत. या लोकांची अवहेलना त्यांना पहावत नसे. त्यांची दया येऊनही ते काहीही करू शकत नव्हते. वडिलांच्या भीतीने त्यांना शाळेतून घरीही जायला नको वाटे. कधी कधी वडील रागावल्यानंतर आईचा आश्रय ते घेत. वडिलांसमोर आईचेही काही चालत नसे. मित्रांच्या बरोबर खेळायला त्यांना फार आवडे. परंतु घरात श्रीमंती असल्याने राजेंद्रसिंहांना त्यांचे वडील गरीब मुलांशी खेळू देत नसत. मित्रांचे राजेंद्रसिंहांच्यावर फार प्रेम होते. ते राजेंद्रसिंहांसाठी बोरे, चिंचा, पेरू याचा वाटा बाजूला काढून ठेवत.

त्यांच्या घराजवळच राहात असलेला गोपाल व राजेंद्रसिंहांची घट्ट मैत्री असते. परंतु कर्जात जमीन गेल्याने गोपालच्या कुटुंबाला गाव सोडावे लागते. स्वार्थी, दुष्ट जमीनदाराविरूद्ध आवाज उठवणार असे त्याचे स्वप्न असते. तो सोडून जाणार आहे हे समजल्यानंतर राजेंद्रसिंहांना फार दु:ख होते. गोपालची आठवण त्यांना नेहमी येई. एक दिवस अचानक त्याची भेट होते. राजेंद्रसिंह आनंदून जातात. मित्र भेटल्याचा आनंद अनुभवत

असतानाच एक दु:खद बातमी कळते. गोपालला लिव्हर कॅन्सर असतो. हे कळताच 'जखमी पाखरासारखं राजेंद्रचं मन तडफडतं होतं.'[२] परंतू ते काहीच करू शकत नव्हते. काही दिवसांतच गोपालचा मृत्यू होतो. रंजल्या गांजलेल्यांसाठी, गरिबांसाठी काही तरी करण्याचे त्याचे स्वप्न अधुरे राहते. ते पूर्ण करण्याचा ध्यास राजेंद्रसिंह घेतात. इथून कादंबरी नायकाच्या जीवनप्रवासाला सुरुवात होते.

महाविद्यालयात असताना महाविद्यालयाच्या परिसरात झोपड्यांना आग लागते. परीक्षेचे दिवस असतानाही आग विझवण्याचा प्रयत्न ते करतात. झोपड्यात राहणाऱ्या मोलमजुरी करून जगणाऱ्या लोकांनाही मदत करतात. 'तरुण भारत संघा'ची स्थापना करून अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा भागवण्याचा ते प्रयत्न करतात. भाजलेल्या व्यक्तिंसाठी औषधाची सोय केली जाते. महाविद्यालयात असताना ते अनेक संस्कार शिबिरे घेतात. अशा छोट्या छोट्या गोष्टींतून राजेंद्रसिंहांच्या अंगी भिनलेली कृतीशीलता दिसून येते.

राजेंद्रसिंह आयुर्वेदिक पदवी घेऊन डॉक्टर होतात. सरकारी सेवेत प्रकल्प अधिकारी म्हणून नोकरीला लागतात. परंपरेनुसार आईवडील त्यांचे लग्न करून देतात. राजेंद्रसिंहांनी आपला संसार पहावा अशी त्यांच्या आईवडिलांची इच्छा असते. राजेंद्रसिंह प्रकल्प अधिकारी म्हणून राजस्थानच्या ग्रामीण भागात काम करत असताना त्यांना अनेक समस्या दिसतात. त्या भागात पावसाच्या अभावाने भेसूर झालेली जमीन, आटलेल्या नद्या, विहिरी, तेथील तरण्याताठ्या मुलांनी रोजगारासाठी शहराकडे घेतलेली धाव, थेंबा-थेंबासाठी आसूसलेली माती आणि माणसे, त्या माणसांच्या चेहऱ्यावर असणारी काळी सावली, जिवंतपणी मृत्यूशी झालेली त्यांची गळाभेट, त्यांना असहाय्य करणारा वर्तमानकाळ व भीषण भविष्यकाळ त्यांच्या डोळ्यांसमोर उभा राहतो. हे सर्व अलिप्तपणे बघत राहणे त्याच्या सद्सद्विवेकबुद्धीला पटत नाही. आपल्या या भावा-बहिणींसाठी काहीतरी करायचेच असे ठरवतात. नोकरीचा राजीनामा देऊन पूर्ण वेळ या लोकांसाठी द्यायचा असा निश्चय करतात. या कामात आपली पत्नी मीना हिची साथ आपल्याला मिळावी असे त्यांना मनोमन वाटते. परंतु नोकरी सोडून इतरांसाठी जगणे मीनाला मान्य नसते. ती साथ द्यायला

नकार देते. राजेंद्रसिंह मीनाला म्हणतात, ''मीना तूच मला समजून घेतलं नाहीस तर कसं? मी तुला पुन्हा एकदा सांगतो, मला तुझ्या सोबतीची खूप गरज आहे.''[३]

राजेंद्रसिंह आपल्या निर्णयावर ठाम असतात. त्यांना मित्रांची आठवण येते. त्यांचे मित्र व ते आपले शिक्षण, निरोगी शरीर, संवेदनशील मन याचा उपयोग ग्रामसुधारणेसाठी करायचे ठरवतात. गांधीजींच्या तत्त्वानुसार ग्रामविकासाचे व गोपालचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ते अलवर जिल्ह्यातील किशोरी या गावी येतात. गावकऱ्यांकडून त्यांना प्रतिसाद मिळत नाही. उलट गावकरी त्यांची अवहेलना करतात. राजेंद्रसिंह गावकऱ्यांना आपली ओळख सांगतात. ''भाई, मी राजेंद्रसिंह, सरकारी खात्यात प्रकल्प अधिकारी होतो. हे माझे मित्र हनुमान, केदार, सत्येंद्र आणि नरेंद्र. आम्ही इथे का आलोत ते उद्या सकाळी तुम्हाला सांगतो. आमच्यावर विश्वास ठेवा.''[४]

गावकरी त्यांच्यावर पोरं पळवणारी टोळी, अतिरेकी म्हणून संशय घेतात. पण राजेंद्रसिंह त्यांना सांगतात, ''चाचाजी, पाहिजे तर आम्ही हनुमानजीची कसम घेतो, आमच्या मनात तसलं काही नाही. आम्ही तुमच्यासारखीच साधी माणसं आहोत.''[५]

राजेंद्रसिंह व त्यांच्या साथीदारांच्या मनात विचार येतात. 'आपल्या गावात, देशात अवतीभोवती इतकं अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा, अन्याय आहे की, ते उघड्या डोळ्यांनी पाहत असतानाही तिकडे दुर्लक्ष करायचं आणि निर्लज्जपणे आपल्या सुखाचा एक कृत्रिम कोष निर्माण करायचा न् त्यातच जगायचं हे मनाला पटत नाही. असं जगणं म्हणजे स्वत:च स्वत:शी विश्वासघात केल्यासारखे आहे. मला वाटतं या अनिष्ट गोष्टी नाहीशा करण्यासाठी आपण ठरवलं तर निश्चितपणे काहीतरी करू शकू.'[६] सिद्धार्थाचा गौतमबुद्ध ज्याप्रमाणे घडला, आपल्या कुटुंबाचा, सुखाचा त्याग करून चिंतनाचा, तपश्चर्येचा मार्ग ज्याप्रमाणे स्वीकारला त्याप्रमाणे राजेंद्रसिंह आपल्या नोकरीचा, कुटुंबाचा त्याग करून अनेक प्रश्नांनी ग्रासलेल्या लोकांसाठी जगायचे ठरवतात.

प्रथम राजेंद्रसिंह गावात आले तेव्हा शाळा बांधण्याचा विचार करतात. पण तिथला परिसर पाहून लोकांच्या जीवन-मरणाचा प्रश्न पाणी आहे व तो प्रथम सोडवायाला हवा असा निश्चय करतात.

तिथली भूमी पावसाच्या अवकृपेमुळे भयाण, भेसूर झालेली असते. तिचा कायापालट करण्याचा हेतू राजेंद्रसिंह गावकऱ्यांसमोर मांडतात. जोहड ची संकल्पना त्यांना समजावून सांगतात. जुने जोहड पाहून त्याप्रमाणे नवीन जोहड बांधण्याचा निर्णय घेतात. राजेंद्रसिंहांना वाटते पाण्याचा थेंब - थेंब अडवण्याचे काम जोहड करत असतात. पाणी जमिनीत मुरल्याने इतर विहिरींना पाणी येते. गाईगुरांना, शेतीला पाणी मिळेल. हे सांगण्यासाठी राजेंद्रसिंह गावकऱ्यांना एकत्र बोलवतात. जोहड बाबतचे आपले मत त्यांच्यापुढे व्यक्त करतात. प्रथम गावकऱ्यांचा त्याच्यावर विश्वास बसत नाही. त्यांचा विश्वास संपादन करणे आवश्यक असल्याने राजेंद्रसिंह त्यांना पटवून सांगतात. त्यांचा विश्वास संपादन करतात व पूर्वीच्या जोहड प्रमाणेच नवीन जोहड बांधण्याचा निर्णय गावकरी व राजेंद्रसिंह घेतात. अशावेळी पत्नीची सोबत मिळत नाही. त्यांचा मित्र सत्येन्द्र म्हणतो, ''राजेंद्र, आमचे उच्च शिक्षण केवळ जोहड तलाव खणण्यासाठी वाया जाईल असे आम्हाला वाटते. आम्ही इथे राहू शकत नाही.''[७] यामुळे राजेंद्रसिंह एकाकी होतात. परंतु खचून न जाता जोहड खणण्यास प्रारंभ करतात. ज्यांच्यासाठी जोहड बांधणार होते ते गावकरीही जोहडच्या कामात राजेंद्रसिंहांना मदत करायला येत नव्हते. ते एकटेच जोहड खणत राहतात.

पहिल्यांदा जोहडच्या कामाला कजौडी व जंबुरी या स्त्रिया मदत करायला येतात. नंतर हळूहळू गावकरी मदत करायला येऊ लागतात. कामासाठी परगावी गेलेल्या व्यक्तीही परत येतात. सर्वांच्या सहकार्यातून हळूहळू जोहड पूर्ण होतात. आजूबाजूच्या गावातील लोकही पहायला येतात. राजेंद्रभैय्यांना जोहड बाबतची माहिती विचारतात. ''आमच्या गावातही जोहड बांधायचाय, भैय्या येतोस का जरा.''[८] असे भीत भीत विचारतात. त्यांना ते अट घालत. ज्या गावात कुणीही दारु पीत नाही अथवा बनवत नाही अशाच गावात जोहड बांधले जातील. गावकरीही ते मान्य करत व जोहडच्या कामाला सुरुवात होई. यामुळे गावे व्यसनापासून व पाणी टंचाईपासून मुक्त होऊ लागतात.

राजेंद्रसिंहांची राहण्याची सोय सुमेरसिंहांने भिकमपुरा गावात केलेली असते. तेथेच 'तरुण भारत संघा'चे कार्यालय स्थापन होते. यामार्फत मुलांना शाळा व आरोग्यकेंद्रे सुरू केली जातात. मांगू, बदरी, नानगराम, जगदीश, भगवाना, काळू, रामदयाळ या गावकऱ्यांचे

प्रेम राजेंद्रसिंहांना मिळते. राजेंद्रसिंहांचे व गावकऱ्यांचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण होते. या गावकऱ्यांच्या सहवासामुळे त्यांना कधी एकाकी वाटत नाही. सोडून गेलेल्या मित्रांची ही आठवण फारशी येत नसे.

राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाने अनेक जोहड तलाव बांधले जातात. पिंपळवाला, बिचवाला, जंगलवाला, बीजाची ढाहवाला असे जोहड बांधले जातात. तीन-चार वर्षांत गावागावात वस्तीजवळ अनेक जोहडची निर्मिती होते. जोहडमुळे कमी पाऊस असून देखील पाणीटंचाई दूर होते. शेती पिकू लागते. जनावरांना भरपूर चारा मिळतो. जोहड बांधण्यास काही दानी व्यक्ती व संस्थांकडून मदत मिळावी म्हणून राजेंद्रसिंह प्रयत्न करतात. या जोहडमुळे अनेकांचा पाण्याचा प्रश्न सुटतो.

अचानक महापुराचा प्रसंग उद्‌भवतो. पुरात सापडलेल्या लोकांना वाचवण्याचे राजेंद्रसिंहांचे व 'तरुण भारत संघा'चे अथक परिश्रम चालू होतात. या महापुरामुळे मलेरिया, ताप, कॉलरा अशा जीवघेण्या नवीन आपत्ती येतात. या आपत्तींपासून वाचवण्यासाठी त्यांना औषधे पुरविण्यासाठी केंद्रे सुरू करतात. घरे उभी राहण्यासाठी बेघरांना छत देतात, पत्रे मागवून त्यांचे वाटप करतात. या मदतीने त्यांची घरे उभी राहिली जातात.

असंख्य खाणी, वृक्षतोड हे पाहून त्यांचे मन अस्वस्थ होते. "खाणीसाठी लावलेल्या सुरुंगाच्या स्फोटाच्या आवाजाने जंगली जीव घाबरून सैरावैरा पळतात. त्यांनी कुठं जावं? पैशासाठी हे लोक सरिस्काचे स्मशान करू लागलेत."[१] असे संतापाने राजेंद्रसिंह बोलतात. त्यांचे मन या विचाराने अस्वस्थ होते. राजेंद्रसिंह व गावकरी या खाणमालकाविरूद्ध आंदोलन छेडतात. सरिस्कामध्ये चाललेल्या खाणींच्या कामांमुळे अनेक कामगारांना दमा, खोकला, टी. बी., सिलिकोसीस, फुफ्फुसाचे आजार अशा अनेक रोगांना सामोरे जावे लागत होते. अनेकांचे या आजाराने मृत्यू होतो. तर कित्येक जणांचा खाणीत पडून मृत्यू होई. अन्यायाविरुद्ध लढा देणाऱ्या राजेंद्रसिंहांना त्यांच्या या वेदना पहावत नाहीत. राजेंद्रसिंह या गोरगरीब गावकऱ्यांना खाण मालकाविरुद्ध लढा देण्यास प्रवृत्त करतात. त्यांना मार्गदर्शन करतात. खाणमालक भडकतात व राजेंद्रसिंहांवर प्राणघातक हल्ले करतात. परंतु राजेंद्रसिंह त्या हल्ल्यातून वाचतात.

जंगलातील अनेक आवश्यक औषधी वनस्पती दुर्मिळ होऊ लागल्याने त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी राजेंद्रसिंह राजस्थानमध्ये प्रबळ असणाऱ्या रुढी, परंपरा, अंधश्रद्धा यांचा उपयोग करून 'पर्यावरण यज्ञा'चे आयोजन करतात. याच प्रमाणे 'धराडी' संमेलनाचेही आयोजन करतात. कुलदैवताप्रमाणे वृक्षदैवत असणारी 'धराडी'ची परंपरा सर्व गावकऱ्यांना एकत्र बोलवून राजेंद्रसिंह 'धराडी'ची परंपरा प्रत्येकास सांगण्यास सांगतात.

राजेंद्रसिंह पाणीप्रश्न, बेकायदेशीर वृक्षतोड, वन्य प्राण्यांची शिकार या सारख्या समस्या सोडवतात, त्याचबरोबर खाणकामगारांचे प्रश्न सोडवतात. अशा हताश झालेल्या व्यक्तिंसाठी त्याचा मदतीचा हात नेहमीच तत्पर असतो.

या सर्व समस्या पाहून राजेंद्रसिंहांकडून 'अरवली वाचवा' या आंदोलनाची पूर्वतयारी करण्यासाठी एका दिवसाच्या शिबिराचे आयोजन केले जाते. झाडांचे, जंगलाचे, निसर्गाचे महत्त्व आदिवासी, गावकऱ्यांना समजले होते पण शहरातील सुशिक्षित लोकांना याचे महत्त्व समजण्यासाठी या आंदोलनाचे आयोजन केले होते. 'अरवली चेतना पदयात्रा' काढण्यात येते. यात खेड्यापाड्यातील लोकांना अनेक योजनांची माहिती करून दिली जाते. यातूनच राजेंद्रसिंहांना अनेक उत्साही कार्यकर्ते भेटतात.

सरिस्का या निसर्गरम्य जंगलात सातसितारा हॉटेलच्या इमारतीसमोर राजेंद्रसिंह रामपाठाचे आयोजन करतात. या हॉटेलमुळे जंगलाची, पर्यावरणाची, वृक्षांची हानी झाली असती. त्याचप्रमाणे या रामपाठामुळे सर्वजण एकत्र येतील व सर्वांच्यात एकी होईल असा हेतू राजेंद्रसिंहांचा असतो. म्हणून रामपाठाचे आयोजन केले जाते. सातसितारा हॉटेलला विरोध केला जातो.

राजेंद्रसिंहांच्या या विविध असामान्य कार्याच्या सन्मानाप्रीत्यर्थ फिलिपाईन्सच्या अध्यक्षा ग्लोरिया अरोरो यांच्या हस्ते जागतिक कीर्तीचा ' रॅमन मॅगसेस' पुरस्कार राजधानी मनिला येथे देण्यात येतो. सुरेखा शहा कादंबरीच्या लेखनासाठी राजेंद्रसिंहांची मुलाखत घेण्यासाठी जातात. 'चमकदार स्वप्नाळू डोळ्यांचा, नेहमी प्रसन्नचित्त असणारा, सुती कुरता, पायजमा, अंगावर शाल नाहीतर गळ्याशी उपरण्यासारखे वस्त्र लपेटलेला, माथ्यावरच्या केसांचे लाड न करता तसेच अस्ताव्यस्त राहू देणारा हा युवा-ऋषीसदृश तरुण अंतरंगी

जेवढा हळवा आहे तेवढ्याच कणखर आहे, जेवढा विनम्र आहे तेवढाच निश्चयी आहे याचा प्रत्यय मला आला.'[१०] असे राजेंद्रसिंहाविषयी सुरेखा शहा लिहितात.

राजेंद्रसिंहांचे मीनावर, रेणूवर, मौलिक यांच्यावर खूप प्रेम होते. पण त्यांना अनेक कामातून जयपूरला आपल्या कुटुंबात एकरूप व्हायला मिळत नसे. आवडी-निवडी ही पहाता येत नसत. त्यांना कारल्याची भाजी व दुधात गूळ मिसळून प्यायला आवडे. परंतु त्यांना अनेक ठिकाणी जावे लागत असल्याने आवडी-निवडींचा विचार करून चालत नसे. राजेंद्रसिंह व त्यांचे कुटुंब जयपूर येथील मानसरोवर कॉलनीतल्या घरी राहत होते. ते एक नव्या जून्या भारतीय वास्तुशैलीचा संगम होता. दगडाचे बांधकाम, मध्यभागी छोटेसे अंगण, घरात साधेपणा, नीटनेटकेपणा होता. तेथे ऐश्वर्यशाली फर्निचर अथवा वस्तू नव्हत्या. ते एक कर्तव्यदक्ष कार्यकर्त्याचे घर होते. डॉ. फडकुले राजेंद्रसिंहांविषयी आपले मत व्यक्त करतात. ''राजेंद्रसिंह यांचे रचनात्मक कार्य विलक्षण आहे. त्यांच्याकडे नवनिर्मितीचा उदंड उत्साह आहे. राजस्थानच्या ग्रामीण भागात दारिद्र्य, अंधश्रद्धा, दुष्काळ या समस्या पाहून अस्वस्थ झालेला तरुण परिस्थितीत बदल घडविण्यासाठी उभा राहतो. एक प्रकारे नियती व माणूस यांच्यातीलच हे द्वंद्व आहे. प्रतिकूल नियतीविरूद्ध राजेंद्रसिंह एकाकी उभे राहिले. कुणीही साह्याला नाही. समोर आव्हान आहे. परंतु हळूहळू लोकांच्यात परिवर्तन घडवून आणले.''[११] राजेंद्रसिंहांच्या व्यक्तिरेखेचे चित्रण सुरेखा शहांनी समर्पक शब्दात केले आहे.

उच्च-श्रीमंत वर्गातील राजेंद्रसिंहांचा निर्धार, अथक परिश्रम, गावकऱ्यांचा संपादलेला विश्वास, कर्तव्याप्रती अविचल निष्ठा, संकटावर मात करण्याचा आत्मविश्वास, अहिंसेचे पालन यातून लेखिकेने नायकाची रेखाटलेली व्यक्तिरेखा संबंध कादंबरीभर विकसित होताना दिसून येते.

**कजौडी**

आपला पती बाहेरगावी असताना कुटुंबाचे पालनपोषण करणारी, दररोज पाण्यासाठी भटकणारी व राजेंद्रसिंहांच्या जोहडला सर्वप्रथम साथ देणारी स्त्री म्हणजे कजौडी, किशोरी आणि गोपालपुरा या दोन गावांच्यामध्ये तिची वस्ती असते. तिचा नवरा किशन कामासाठी अमदाबादला जातो. तिही खाणीच्या कामावर जायची. खूप कष्ट करुनही मनासारखी मजूरी मिळत नसते. त्यांचा उदरनिर्वाह मिळणाऱ्या मजूरीतूनच होत होता.

कजौडी निरक्षर असूनही तिचे विचार प्रगल्भ असतात. आपल्या जवळ शाळा नाही, आपली मुले शाळेत जात नाहीत याची तिला खंत वाटते. मुले शाळेत गेल्याने त्यांचे विचार सुधारतात, त्यांना नोकरी मिळेल असे तिला वाटत होते. कजौडीला घालायला कपडेही नसतात. 'रात्री झोपताना अंगावर चार ठिकाणी फाटलेली दोन रंगाची, चार तुकड्यांची चोळी आणि तसाच जीर्ण झालेला घागरा नेसून ती रोज झोपायची. पहाटे पाणी आणायला बाहेर जाताना मात्र धड चोळी, घागरा बदलायची आणि लाल सुती घुंगट घ्यायची.'[१२] अशा प्रकारे जीवन कंठणारी ही कजौडी. 'कजौडी' या कादंबरीमध्ये आरंभी येते.

कजौडीला आपल्या माहेरची आठवण येई. गच्चीवर साठवलेले पाणी तीन-चार महिने राहायचे. पाणीही जवळ होते पण सासरी मात्र पाण्यासाठी वणवण फिरत असते. पूर्वी पोटापुरती बाजरी पिकायची. पण आता मात्र ना शेतीला पाणी, ना प्यायला पाणी. सर्व ओसाड होत चाललेले जीवन होते. दोन-तीन दिवसांतून एकदा ती मुलांना आंघोळ घालत असे. तेच पाणी गाईला पाजत असे.

कजौडी खायला सुक्या हरबऱ्याच्या भाजीत मूगडाळ, मिरची घालून शिजवी व त्याची आमटी करी. किशन आला की मात्र बाजरीची रोटी करी. एक दिवस किशनसाठी ती लापशी करणार असते. परंतु त्यासाठी तूप नव्हते. पगार आला की बाजार भरला जाई. पण कसे तरी एकवेळचे भागायचे, रात्री पळीभर राबडी व पोटभर पाणी पिऊन झोपावे लागे. एवढे कष्ट करुनही दोन वेळचे जेवायलाही मिळत नव्हते. या सर्वाला कजौडी वैतागली होती. ती जमनाला म्हणते, ''जमना एवढी पायपीट करून चालत जायचं, मर मर काम

करायचं, पण मजुरी किती कमी देतात, वाटतं की यापेक्षा जहर खावं आणि कायमचं झोपून जावं.''[१३]

कजौडीच्या मुलाला राजेंद्रसिंहांनी औषधे देऊन बरे केले असल्याने कजौडीचा विश्वास त्यांच्यावर बसतो. राजेंद्रसिंह एकटेच जोहड खणत असल्याने कजौडी त्यांना मदत करण्याचा निश्चय करते व जोहड खणण्यास पहिल्यांदा मदत करते. राजेंद्रसिंहांनी दिलेली मजुरी कजौडी नाकारते. कजौडीचा नवराही जोहडच्या कामाला मदत करायला गावी परत येतो. याचा आनंद कजौडीला फार होतो. पहिल्या पावसाने जोहड भरताना पाहून तिला आनंद होतो. कजौडी व इतरजण गाऊ लागतात.

''रिमझिम रिमझिम बादली बरसेला
बरसेला म्हारा देसमें
सुखी खेती हरियावेला
धारासो घर भर जावेला म्हारा देसमें
कारी कारी बादली बरसेला म्हारा देसमें ।।''[१४]

मधल्या कालखंडात कजौडीने गालिचे विणण्याचे प्रशिक्षण घेतलेले असते व ती गालिचे विणण्याचे केंद्र सुरू करते. कजौडीसह इतर बायका दररोज हे काम करत. आकर्षक, किमतीने कमी, टिकाऊ असल्याने त्या गालीच्यांना चांगली मागणी येते. कजौडीच्या देखरेखीखाली गालिचे बनू लागतात. या कामात तिला खूप पैसे मिळतात. पूर्वीच्या झोपड्या जाऊन त्या ठिकाणी पक्की घरे बांधली जातात. दहा बारा वर्षांत सर्वांची परिस्थिती बदलते. कमाईचे पैसे ती पतपेढीत ठेवते. म्हैशी घेतल्या होत्या, त्यांचे दूध ती डेअरीला घालते. कजौडीच्या घरात आता दूधदुभत्याची, खाण्यापिण्याची, कपड्यालत्त्यांची कशाचीही कमी नव्हती. कजौडीची मुलगी सातवीपर्यंत शिकते. कजौडी मुलाचे व मुलीचे लग्न एकाच मांडवात करणार असते.

रामप्यारी, जंबुरी, जाखडीमाई या व इतर स्त्रिया कजौडीला मदत करीत. कजौडीला खूप आनंद होतो. तिला मनासारखे जावई, सून मिळतात. त्यामुळे तिच्या आयुष्यातील

अत्यंतिक आनंदाचा तो क्षण असतो. कजौडी व किशन राजेंद्रसिंहांना आमंत्रण द्यायला. भिकमपुऱ्याच्या आश्रमात जातात. कजौडी राजेंद्रसिंहांना म्हणते, ''नाही भैय्या, तुम्ही यायलाच पाहिजे. तुमच्याबिगर शादी होणार नाही. तुम्ही म्हणाल तर मी दुसरा मुहूर्त बघते, पण तुमच्या आशीर्वादाशिवाय माझ्या घरातले हे शुभकार्य करणार नाही. देखो भैय्या !''[१५] या लोकांची राजेंद्रसिंहांवर श्रद्धा होती. त्यांच्यामुळेच त्यांना हे दिवस पहाता आले होते. परंतु आता कशाचीही कमतरता नव्हती. कजौडी व इतरही लोक त्यांना विसरलेले नसतात. दिवसरात्र राबणाऱ्या या स्त्रिया मंगलप्रसंगी नाच-गाण्यात दंगून जातात. राजेंद्रसिंहांच्या आगमनाने त्यांना खूप आनंद होतो.

आयुष्यभर कष्ट उपसणारी कजौडी जोहड बांधल्यानंतर मात्र आनंदी जीवन जगू लागते. कजौडी ही स्त्री असूनही प्रथम जोहडच्या कामाला हातभार लावून ती साऱ्या गावालाच लाजवेल असे काम करते. ती इतर लोकांचा विचार करीत नाही. तिला जे योग्य वाटते तेच ती करते. अशा या धाडशी, योग्य निर्णय घेणाऱ्या कजौडीची व्यक्तिरेखा 'जोहड' या कादंबरीत पहावयास मिळतात.

**किशन**

आपल्या पत्नीच्या कार्यात साथ देणारा कजौडीचा नवरा म्हणजे किशन. गावात पाणी नसल्याने शेती पिकत नाही, त्यामुळे पैसे मिळविण्यासाठी किशन अमदाबादला कामासाठी जात असे. जिथे बांधकाम असायचे तिथे छत टाकले की त्याखाली झोपायचा. अशावेळी जेवणाचे हाल होत असे. घरापासून दूर असल्याने किशनला मुन्नीची, गोपाळची घरातील सर्व व्यक्तिंची आठवण येई. कजौडीच्या जेवणाची आठवण होई. मजुरी बुडत असल्याने व खर्च होत असल्याने तो घरी यायलाही तयार नसे. आपली परिस्थिती माहीत असल्याने चार पैसे साठवून येताना मुलांसाठी तो कपडे आणत असे. इच्छा असूनही बायकोला काहीच आणता येत नव्हते. जोहडच्या कामाला गावात सुरवात होते. मजुरीसाठी बाहेरगावी गेलेला किशन गावी परत येतो. जोहडच्या कामात तोही मदत करु लागतो.

**दडकीमाई**

जीवनातील अनेक संकटांना तोंड देणारी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला सडेतोड जवाब देणारी लिलुंडाची आदर्श स्त्री म्हणजे दडकीमाई. वयाने पंचावन्न - साठी गाठलेली, परंतु अजूनही गावासाठी काही तरी करण्याची उमेद असलेली, तिचे वैवाहिक जीवन मात्र दु:खकारक असते. तिचा नवरा दारु पिऊन तिला त्रास देत असतो म्हणून ती त्याच्यावर कोर्ट कचेऱ्या करते. यावरुनच ती किती खंबीर आहे याची प्रचिती येते.

'ऊनवाऱ्यानें रापलेला चेहरा, चेहऱ्यावरच्या सुरकुत्यातून दिसणारा खंबीरपणा, हात, पाय एखाद्या शिसमच्या लाकडासारखे, कमरेला जुनाट, नक्षीदार लुगडा, तीन - चार ठिकाणी फाटलेली लाल ओढणी माथ्यावरुन घेतलेली. गळ्यात चांदीच्या टिमण्यांची माळ, हातात नोगरी, आवाजात धीटपणा आणि खोल गेलेले त्यांच्याकडे पाहणारे तिचे डोळे म्हणजे ठिणग्याच जणू.'[१६] अशी ही दडकीमाई असते.

लिलुंडा हे दडकीमाईचे गाव असते. लिलुंडाच्या जवळच असणाऱ्या भर्तृहरी गावाचा तिला अभिमान वाटत होता तर लिलुंडाचा राग येत होता कारण लिलुंड्यांला जाण्या-येण्यासाठी दोन कोसांचा चढ चढावा-उतरावा लागत होता. प्यायला किंवा गुरांना तीन - चार महिने पाणी नसल्यामुळे तेवढा काळ गावकरी गाव सोडून जायचे, पाऊस आला की परत लिलुंड्याला यायचे. जो त्रास आपल्याला सहन करावा लागतो तो आपल्या मुलांना, नातवंडांना, गावकऱ्यांना सहन करायला लागू नये असे दडकीमाईला वाटते. त्यामुळे गावासाठी काहीतरी करण्याची तिची प्रबळ इच्छा तिच्या मनात निर्माण होते. राजेंद्रसिंहाचा जोहडचा इतिहास तिने ऐकलेला असतो. पाणीटंचाईपासून गाव मुक्त व्हावे म्हणून ती राजेंद्रसिंहाची भेट घेण्याचा निर्णय घेते. राजेंद्रसिंहाची भेट घ्यायला तिच्याबरोबर गावातील एकही व्यक्ती तयार होत नाही. ती एकटीच निर्भिडपणे, जिद्दीने त्यांची भेट घ्यायला जाते. राजेंद्रसिंहाना भेटून तिला आनंद होतो. जोहड बांधण्याची संकल्पना ती राजेंद्रसिंहापुढे मांडते. राजेंद्रसिंह काही अटी घालतात. जोहड बांधताना पैशाचा तिसरा हिस्सा गावकऱ्याचा. गावकऱ्यांनी कष्ट करायचे, गावात कुणीही नशा करायची नाही. या अटी ती मान्य करते. जोहडची जबाबदारी आपल्यावर घेते. दडकीमाई म्हणते ''मी कसम घेते,

सगळी जबाबदारी माझी. मी कुणालाही भीत नाही. कष्टाला डरत नाही. अरे जोहडवाले बाबा, तुला माहिती नाही, या दडकीनं काय काय भोगलंय ते ! दैवाला भ्यायले नाही, कोर्ट कचेऱ्याला डरले नाही. मग कशाला भ्यायचं ? आपली करणी अच्छी असली की झालं.''[१७] यामधून दडकी माईचा स्वभाव दिसतो.

राजेंद्रसिंहांचा होकार कळताच तिला आनंद होतो. लिलुंडला जाताना तिला डोंगरातून तोल सांभाळून जावे लागे. तिथे दवाखाना, रस्ता, शाळा अशा कसल्याही सोई - सुविधा नसतात. तिला याचे वाईट वाटे. दडकीमाई राजेंद्रसिंहाची गावकऱ्यांना ओळख करुन देते. गावकरी जोहड बांधण्याबाबतच्या सर्व अटी मान्य करतात. परंतु पैशाबाबत कुजबुज सुरु होते तेव्हा दडकीमाई म्हणते, ''...गावाच्या हिश्याचे पैसे मी देईन, मग तर झालं ! पण तुम्ही बापे जोहडचं काम तरी कराल की नाही ?''[१८] कष्ट करून नवऱ्यापासून लपवून पै-पै गोळा करुन ठेवलेले दोन हजार चारशे रुपये ती राजेंद्रसिंहाकडे देते.

जोहडच्या सामानाचा ट्रक जंगलातून जात असताना तो अडवला जातो. दडकीमाई स्वत: पुढे होते, ट्रकमध्ये बसते, ट्रक पुढे नेते. कोणाचेही ट्रक अडविण्याचे धाडस होत नाही. जोहडच्या कामात ती जातीने लक्ष देते. गावामध्ये रस्ता करण्याचे, विधवा बायकांना मदत मिळवून देण्याचे, शाळा काढण्याचे तिचे स्वप्न असते. ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत मात्र ती पराभूत होते. त्यामुळे तिला काहीच सुधारणा करता येत नाहीत. ती गावच्या सुधारणेसाठी नेहमीच तयार असते.

राजेंद्रसिंह दमडी विषयी आपले मत व्यक्त करताना म्हणतात, ''पंचावन्न - साठ वर्षांची ती प्रौढ स्त्री, चेहऱ्यावर वयाबरोबरच जिद्दीच्या रेषा, बोलणं म्हणजे असं कुणीतरी थाळीत पाच - पंचवीस नाणी ओतावीत न त्यांचा नाद व्हावा तसं.''[१९]

अशाप्रकारे निर्धार, निश्चयी स्वाभावाची, परिश्रम करणारी, जागृत असणारी, कष्टावर विश्वास ठेवणारी, चांगुलपणा दाखवणारी, गावासाठी झिजण्याची तयारी असणारी करारी, सर्वगुणसंपन्न दडकीमाईची व्यक्तिरेखा 'जोहड' या कादंबरीत येते.

**गोपाल**

गोपाल हा राजेंद्रसिंहांचा बालपणीचा मित्र असतो तो राजेंद्रसिंहाना लहानपणीच सोडून गेलेला असतो. नंतर अचानक त्यांची भेट होते. धारधार नाक, कपाळावरची खूण आणि बोलके डोळे असा हा गोपाळ; भेटीने दोघेही आनंदी होतात. त्यांना लहानपणीचे दिवस आठवतात. लहानपणी सुख दुःखात साथ देणारे हे बालमित्र दुरावतात. गोपालच्या वडिलांनी बहिणीच्या लग्नासाठी चार बिघे जमीन सरकारकडे गहाण ठेवलेली असते. ते कर्ज फेडता न आल्याने ते कर्जात बुडतात. खायलाही अन्न मिळत नाही. गाव सोडण्याचा निर्णय घेतात. त्यामुळे गोपालची व राजेंद्रसिंहाची ताटातुट होते.

कर्जात जमीन जाते याचा राग लहानपणापासूनच गोपाळच्या मनात असतो. स्वार्थी सरकारविरुद्ध व जमीनदारांविरुद्ध लढाई करण्याचा निर्धार गोपालचे बालमन करते. गोपालचा हा निर्धार अथक व अखंड राहतो. अशी वेळ दुसऱ्या कुणावरही येऊ नये असे गोपालला वाटते.

सरकारी कामानिमित्ताने कचेरीत गोपाळ गेला असता तिथे राजेंद्रसिंहांची भेट होते. रात्र शाळेत शिक्षण पूर्ण केलेला गोपाल पोटापुरती नोकरी करुन उरलेल्या वेळी युनियनचे काम करत असतो. हेवेदावे, भ्रष्टाचार, राजकारण या वातावरणात राहून त्याला जे करायच आहे ते करता येत नसल्यामुळे त्याला सतावणारे प्रश्न तो राजेंद्रसिंहांपुढे मांडतो. गोपाळ राजेंद्रसिंहांना म्हणतो, ''राजेंद्र, जिथं कसल्याही सुविधा नाहीत, सोयी नाहीत, दवाखाने, शाळा नाहीत, रस्तेदेखील नाहीत, अशी कित्येक खेडी आपल्या देशात आजही आहेत. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झालीत, तरीदेखील त्या परिस्थितीत, तिथल्या लोकांसाठी काहीही सुधारणा झाल्या नाहीत. अशांसाठी मला काम करायचंय. त्यांना आपण थोडासा जरी आनंद, सोयी देऊ शकलो, तरीदेखील आपल्या जन्माचं सार्थक होईल असं मला वाटतं.''[२०] यावरुन गोपाळची सर्वसामान्य माणसांविषयीची विचारसरणी दिसून येते.

गोपाळ आजारी पडतो. त्याची प्रकृती खालवली असल्याने चेकअप करुन घेतात. धक्कादायक निदान लागते. लिव्हर कॅन्सर शरीरभर पसरलेला असतो. त्यावर काहीच उपाय होणार नसतो. एक – दीड महिन्यातच गोपालचा मृत्यू होतो.

गोपालचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्याचे मित्र सोई सुविधांनी अभावग्रस्त गावात ग्रामसुधारणेचे काम करण्याचे ठरवतात. त्याच्या कार्याची ज्योत प्रकाशमान करण्याचा निर्णय घेतात. गोपालचीही व्यक्तिरेखा वारंवार कादंबरीत येत नसली तरीही वाचकाच्या मनात घर करुन बसते. राजेंद्रसिंहांना जी प्रेरणा मिळते त्यामध्ये गोपाळच्या विचारांचा वाटा मोठ्या प्रमाणात आहे असे म्हणता येईल.

**मांगू पटेल**

आई – वडिलांच्या वारशाने तीनशे वर्षापूर्वीच्या तीनचौकी हवेलीत मांगू पटेल व त्याचे किती तरी भाऊबंद राहत होते. तो गावचा मुखिया असल्याने सर्व गावकरी आपल्या समस्या मांगू समोर मांडतात. त्या समस्येच निवारण मांगू पटेल करत असतो.

राजेंद्रसिंहांना स्वत:च्या मुलाप्रमाणे प्रत्येकवेळी साथ देणारा, त्यांच्या अनेक समस्या सोडविणारा, जख्खड म्हातारा झालेला हा मांगू दिवसभर आपल्या हवेलीसमोर हुक्का ओढत बसे. त्याच्या 'चेहऱ्यावरच्या असंख्य रेषा, धारधार नाक, खोल गेलेले पण बेरकी वाटणारे डोळे, अंगातला जीर्ण अंगरखा, डोईवरचे पांढरे पागोटे, हुक्का ओढताना ऐट राजासारखी.'[२१] राजेंद्रसिंहांचे मित्र त्यांना सोडून जातात. मांगू मात्र पाठराख्यासारखा त्यांच्या पाठीशी उभा असतो. हताश झालेल्या राजेंद्रसिहांना सावरतो. तो जोहडचा फायदा ओळखून असल्याने जोहड बांधण्यास मार्गदर्शन करतो. जोहड कसा व कुठे बांधायचा ? त्याची लांबी, रुंदी, उंची किती असावी याविषयी सर्व माहिती सांगतो. मांगू म्हणतो, ''माझ्या पणजोबांनी जेव्हा ही हवेली बांधली तेव्हा आमच्या गावाबाहेरचं जोहड पाण्याने तुडुंब भरलेलं असायचं. म्हणूनच धान्याची कोठारे भरलेली असायची. सारं काही आबादीआबाद होतं. गेलं सारं. पण आता आमच्याही गावात जर नवा जोहडबांध बांधला तर जगायला आधार होईल.''[२२]

मांगूच्या मार्गदर्शनाने व गावकऱ्यांच्या सहकार्याने, राजेंद्रसिंहांच्या पुढाकाराने अनेक जोहड पूर्ण होतात. गावचा मुखिया असूनही कुणालाही त्रास न देता सहाय्य करणाऱ्या मांगू पटेलची व्यक्तिरेखा 'जोहड' या कादंबरीत येते.

**झुमा**

पती अपंग असल्याने स्वत: शेतात राबणारी, स्वत:च्या अब्रुचे रक्षण करणारी झुमा. स्वत:च्या शेतात राबून ती आपल्या पतीच्या (माधू) व आपल्या पोटापुरते माधोकडून हट्टाने दोन एकर जमीन झुमाने घेतली होती. झुमाचा नवरा माधो याचे बांधकाम करत असताना दुसऱ्या मजल्यावरुन पडून दोन्ही पाय निकामी होतात. त्यामुळे तिला नवऱ्याचे सहकार्य मिळत नाही. एकटीच हिमतीने संसार चालवते.

झुमा दिसायला अतिशय देखणी असते. गोरा रंग, नाजूक देह, तपकिरी रंगाचे डोळे, नीटस नाककक्षा हे भारतीय स्त्रीचे सौंदर्य, पावित्र्य, थोरवी हे सगळ झुमामध्ये होते. ती सुंदर असल्यामुळे तिची सावत्र आई तिला फार त्रास देई. वयाने मोठ्या असणाऱ्या माधोशी तिचे लग्न करुन दिले जाते. माधोचा स्वभाव बरा असल्याने झुमा माधोबरोबर सुखाने संसार करते. ती माधोबरोबर आनंदी असते. वर्षाच्या आतच तो अपंग होतो. तरीही ती खचून न जाता खंबीरपणे संसार करते. अपंग नवऱ्याला ती कंटाळत नाही. त्याच्यावरील तिचे प्रेम, माया कमी होत नाही.

माधोच्या मनात मात्र तिच्याविषयी संशय निर्माण होतो. तरीही तिला काही वाटत नाही. आजूबाजूचे पुरुष तिच्याकडे वाईट नजरेने पाहतात परंतु ती धीट, करारी असल्याने कुणालाही बळी पडत नाही. ती म्हणते, "...रात्री अंथरुणावर पडल्यावर कधी कधी शरीर अस्वस्थ होई. परंतु ती मनाशी म्हणे आता आपणच आपल्याला सांभाळले पाहिजे, नाहीतर आपल्यात आणि जनावरात काय फरक राहिला ?"[२३] असा ती स्वत:लाच प्रश्न करते. यावरुन तिच्या ठिकाणी असणारे सद्‌वर्तन दिसून येते.

राजेंद्रसिंहांच्या प्रयत्नामुळे दवाखान्यात उपचार केल्यानंतर झुमाच्या नवऱ्याला चालायला येऊ लागते. यावर तिचा विश्वासच बसत नव्हता ती माधोला पाहून फार आनंदी हाते. राजेंद्रसिंहाविषयी तिच्या मनात कृतज्ञता निर्माण होते. त्याला चालायला येऊ लागल्याने दोघेही संसारात रमतात. संसार सुखाचा होतो.

धाडसी, शूर, नि:स्पृह असलेल्या राजेंद्रसिंहांवर अनेक कटकारस्थाने रचूनही निष्फळ ठरतात म्हणून छोटूलाल झुमाला पन्नास हजार रुपये लाच देऊ करतो. झुमाला तो म्हणतो, ''तू फक्त एवढंच करायचं की नवऱ्याला त्याने चालते केले त्याची किंमत वसूल करण्यासाठी म्हणून त्यानं माझा हात धरला. अशी बोंब मारायची.''[२४] हे एकूण झुमाची तळपायाची आग मस्तकाला जाते, ती क्रोधित होते. त्याला शिव्या घालते ती म्हणते ''अरे नरकातल्या किड्या, पाप्या, तुझ्या तोंडात अळ्या पडतील, मोठा रोग होईल तुला. अरे भाईसाबद्दल असे बोलण्याची तुझी हिंमतच कशी झाली ? आणि काय रे ? माझी आबरु मी बाजारात विकायला काढलीय असं वाटलं कां रे तुला ? त्या देवमाणसाला नाहक बदनाम करायला सांगतोयस तू मला ? थांब, तुला माझा इंगा दाखवते. या गावात जर का तुझे काळे तोंड दाखविलेस तर तुला जीवे मारीन मी. मग माझे काही का होईना. एक पाप तर कमी होईल.''[२५] राजेंद्रसिंहासारख्या देवमाणसावर आरोप करणे तिला कदापीही मान्य नसते.

झुमाची व्यक्तिरेखा करारी, स्वाभिमानी, पतीला पोसणारी, कष्ट करणारी, सद्वर्तनी, खंबीर मनाची दिसून येते.

**माधो**

तीन-चार वर्षांपासून अपंग असल्याने आपल्या बायकोचे कष्ट पहात बसलेला माधो या कादंबरीत येतो. पूर्वी गवंडीकाम करण्यासाठी अमदाबादला गेला होता. गिलाव्याचे काम करत असताना दुसऱ्या मजल्यावरुन खाली कोसळल्याने दोन्ही पाय गुडघ्यापासून निकामी होतात. लग्न होऊन एक वर्ष होताच हा अपघात घडलेला असतो. चालता फिरता येत नसल्याने घरात बसून माधो कंटाळतो. आपण काहीच करु शकत नाही या विचाराने तो अस्वस्थ होतो.

माधोची बायको झुमा दिसायला सुंदर असल्याने माधो बायकोवर संशय घेतो. त्याचा चुलत भाऊ सोमू गावातच राहत असल्याने तो भेटल्यानंतर माधोचा वेळ जायचा. एकाकीपणा कमी व्हायचा. गावातील काही गोष्टी समजायच्या. त्याचबरोबर झुमाचीही त्याच्याजवळ चौकशी करायचा. सोमूला भेटून माधोला बरे वाटायचे. परंतु झुमा पतीशी एकनिष्ठ असल्याने कोणत्याही परपुरुषाच्या अधीन जात नव्हती.

माधोचे शेत कांकवाडीजवळ होते. तेथेच जोहड बांधायचा चालल्याने तेथे राजेंद्रसिंहांचे येणे-जाणे असते. ते सोमुजवळ माधोची चौकशी करतात. ते माधोला जयपूरच्या दवाखान्यात नेऊन बूट घालण्याचा सल्ला देतात. सोमू बरोबर माधो जयपूरला जातो. राजेंद्रसिंहांच्या मदतीने त्याला लाकडी बुट मिळतो.

जयपूरच्या बुट सेंटरमधल्या लोकांचे दु:ख पाहून त्याला आपले दु:ख काहीच वाटत नाही माधोला इतराप्रमाणे चालता फिरता येते. माधोला आपल्या पायाने चालता येते या आनंदाने तो भारावून जातो. परावलंबी असणारा माधो काही अंशी स्वावलंबी होतो. स्वत:ची कामे स्वत: करण्यात त्याला आनंद वाटतो त्याच्यात जगण्याची ओढ निर्माण होते, याचे सर्व श्रेय तो राजेंद्रसिंहांना देतो.

**जयराम मीणा**

सरिस्का जंगलाच्या पूर्वेला असलेल्या उमरी या छोट्याशा गावात, गौळीवाडा होता. तेथे जयराम मीणा रहात असे. जंगलात जनावरांसाठी चारा मिळायचा, गायी म्हैशी त्याच्यावरच पोसल्या जायच्या. त्यांचे दूध व जंगलातील जळणफाटा विकून आपला संसार तो चालवत असे. काही आवश्यक वस्तू आणण्यापुरता इतर गावांशी त्याचा संबंध येई.

जयराम मीणा, बलाई, गुर्जर यासारखे धाडसी आदिवासी त्या जंगलात राहत होते. हरिण, ससे, वाघ, सिंह यासारखे प्राणी त्यांच्या आजूबाजूला राहात. परंतु ते आदिवासी या प्राण्यांची कधीच शिकार करत नसत. प्राण्यांवर त्यांचे प्रेम होते.

जंगलातून जाण्या - येण्याचे पैसे जंगल विभागाचा माणूस जबरदस्तीने या आदिवाश्यांकडून घेत असे. जंगलातील लाकडे चोरल्याचा आरोपही त्यांच्यावर घातला जाई. जंगल विभागाची माणसे इतरांकडून पैसे घेऊन झाडाझुडपांची, वन्य प्राण्यांची हत्या करत. गावकऱ्यांकडून कर वसूल करत. याच जंगलात संगमरवर व ग्रॅनाईटच्या खाणी काढल्या जात. या विरुद्ध जयराम आवाज उठवण्याचे ठरवतो. परंतु तो एकटाच असल्याने काहीच करु शकत नाही. सुलेमानने वाघाला घातलेल्या गोळीमुळे जयरामची झोप उडते.

जयराम मीणा व गावातील काही व्यक्ती राजेंद्रसिंहांना भेटतात. राजेंद्रसिंह त्यांना सांगतात की, 'कोणताही कर नसतो. पैसे द्यायचे नाहीत. त्याच्या त्रासाला अथवा बंदुकीला भ्यायचे नाही. अन्याय सहन करायचा नाही. त्याच्याविरुद्ध बंड पुकारले पाहिजे.' जयराम राजेंद्रसिंहांना सहकार्य करण्याची विनंती करतो. राजेंद्रसिंह सहकार्य करण्यास तयार होतात. जयरामला राजेंद्रसिंहाच्या सहकार्याची अपेक्षा असते. ते सहकार्य मिळाल्यामुळे जयराम आनंदी होतो.

जयरामच्या वस्तीवर राजेंद्रसिंह व त्यांचे साथीदार आल्यानंतर त्या सर्वांना तो दूध देतो. सरिस्काच्या जंगलात जे गैरप्रकार चालतात त्याविषयी राजेंद्रसिंह बोलतात. ते जयरामला व गावकऱ्यांना पटते. जयराम म्हणतो, ''सच भैय्या, जे काही करायचं आहे ते आम्हांलाच करावं लागेल. या सरिस्कान पिढ्यानपिढ्या आम्हाला आश्रय दिला, अन्न दिलं. ते आम्ही असं डोळ्यादेखत नष्ट होऊ देणार नाही.''[२६] जयरामच्या या बोलण्यातून सरिस्काविषयी असणारे त्याचे प्रेम व्यक्त होते.

सरिस्का जंगलात झाडे तोडून खाणमालक तेथे खाणी काढत त्यामुळे दुर्मिळ वनस्पती नष्ट होत. हा विनाश थांबवण्यासाठी गरीब व अशिक्षित असणारा जयराम मीणा सर्व गावकऱ्यांना एकत्र बोलवून चाललेला गैरप्रकार थांबवण्यासाठी प्रयत्न करण्याचे सांगतो. सर्व गावकऱ्यांच्या सहकार्याने खाणमालकाविरुद्ध तो आंदोलन छेडतो. यात 'सरिस्का बचाओ, खदान बंद करो', अशा घोषणा त्याच्या खंबीर नेतृत्वाखाली होऊ लागतात.

सरिस्का नष्ट होऊ द्यायचं नाही, हा त्याचा दृढ निश्चय असतो. जंगलाविषयी, वन्य प्राण्यांविषयी अतीव प्रेम असणारी जयरामची व्यक्तिरेखा 'जोहड' या कादंबरी मध्ये पहावयास मिळते.

**प्रेमली**

जयरामला संसारात साथ देणारी त्यांची पत्नी प्रेमली, ही सरिस्का जंगलाच्या पूर्वेला असलेल्या 'उमरी' या गावात गौळीवाडा येथे राहते. घरची सर्व कामे करुन जयरामलाही गायी-म्हैशी सांभाळण्यात ती मदत करते. तिचे नवऱ्यावर प्रेम असते. ती त्याला बाजरीची

रोटी, खेजडीच्या शेंगाची शाक खायला देते, सोबत ताकाच लोटकं देते. खेजड्याच्या शेंगा खाऊन प्रेमलीच्या गायी म्हैशी खूप दूध देत व त्यांची शाकही करता यायची. प्रेमलीच्या नवऱ्याचा वाघापासून बचाव झाल्याने कुलदेवतेचे ती स्मरण करते. नवऱ्याला सर्वोतपरी ती मदत करते.

राजेंद्रसिंहांना भेटायला जाण्याचा निर्णय जयराम प्रेमलीला सांगतो. प्रेमली म्हणते की, ''जाच तुम्ही, गरीबांचे वाली आहेत ते आणि तुम्ही जाताय तर इथं सरिस्कात जोहड बांधायचं बघा. आपल्या वस्तीवरच्या विहिरीत पाणी कुठं आहे ? तिकडं झऱ्याचं पाणी आहे, पण किती लांब आहे ते आणि रोज जीव मुठीत घेऊनच तिथलं पाणी आणावं लागतं. तिथंच तर जंगली जनावर पाणी प्यायला येतात. सदा न् कदा वाघानं फाडण्याची भीती. त्या प्राण्यांनादेखील पाणी प्यायला दुसरे पाणवठे शिल्लक राहिले नाहीत. त्यांचा न् आमचा एकच पाणवठा आहे. देवाची कृपा आहे म्हणूनच आजपर्यंत वाघाच्या पोटात गेलो नाही. झालंच तर हमीरपूर आणि तिकडच्या गावच्या बायकांसाठी त्या भैय्यांनी खूप चांगलं काम केलंय म्हणे, आमच्यासाठीही त्यांना सांगून बघा.''[२७] असे म्हणून प्रेमली आपले मत नवऱ्यासमोर व्यक्त करते. ती धाडसाने जोहडबद्दल राजेंद्रसिंहांनाही सांगते.

प्रेमलीच्या कामाविषयी राजेंद्रसिंह विचारतात तेव्हा ती म्हणते, ''आम्ही गायीगुरांची देखभाल, धारा काढणं, जंगलातून चारा, जळण आणणं ही कामं करतो. शिवाय इथं मेंढ्या असतात. त्यांच्या केसाचे सूत काढतो.''[२८] प्रेमली व तेथील इतर महिला सूत काढत असल्याने त्याना जोड उद्योग म्हणून कंबळ, सतरंजी विणायला शिकवण्यास दोन मार्गदर्शकांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव प्रेमलीपुढे मांडतात. शहरातल्या बाजारात त्या विकल्यास त्याला भाव ही मिळेल. हे ऐकून प्रेमली आनंदून जाते. कंबळ, सतरंज्या विणायला तयार होते. तिला जंगलातला लाकूड फाटा गोळा करुन विकून जास्त पैसे मिळत नाहीत. त्याच्यापेक्षा कंबळी, सतरंच्या विणण्याचे काम प्रेमलीला फार बरे वाटते. ती आनंदून जाते.

## नादानसिंह

राजस्थानमधील करौलीच्या पलीकडे डोंगररांगात राहणाऱ्या नादानसिंहची व्यक्तिरेखा 'जोहड' मध्ये येते. बंदुकीचा धाक दाखवून तो लुटालूट करत असे. आजूबाजुच्या लोकांना त्याचा उपद्रव होता. 'सहा फूट उंची, धारदार नाक, तांब्यासारखी अंगकांती, कोंदणातल्या माणकासारखे दिसणारे लालसर डोळे, त्या डोळ्यात खुन्नस, अविश्वास आणि कौर्य.'[२९] असा दिसणारा नादानसिंह हा डाकू म्हणूनच वावरत होता त्याच्या परिस्थितीने त्याला डाकू बनवले होते. तो एका शेतकऱ्याचा मुलगा असतो. त्याचे कुटुंब शेतात राबून, घाम गाळून, कष्ट करुन जगणारे त्यांच्याकडची शेती जमीनदार बळकावतो. त्यामुळे कुटुंबाला आपल्याच शेतात मजूराप्रमाणे काम् करावे लागते. पोटाला पोटभर अन्नही मिळत नाही. जमीनदाराची वाईट नजर नादानसिंहाच्या बहिणीवर पडते. तो स्वस्थ बसू शकत नाही. तो जमीनदारावर हल्ला करतो. तो मेला असे समजून नादानसिंह पळून जातो व एका टोळीत सामील होतो. त्यामुळे नादानसिंह आई - वडिलांना गमावून बसतो. तो दरोडेखोरांच्या टोळीत सामील झाल्याने घरची वाट बंद होते. नादानसिंह राजेंद्रसिंहाना भेटतो व म्हणतो ''भैय्या, तुला सांगतो, मी दरोडे घालतो, लोकांना लुटतो. दरोड्याच्या वेळी मी लोकांना धमकावलं, मारहाण केली. पण मी कुणाचा खून केला नाही का बायका, पोरीबाळींना हात लावला नाही.'[३०] नादानसिंह डाकू असला तरीही त्याच्यात माणुसकी दिसते.

नादानसिंहाने राजेंद्रसिंहांचे दोन साथीदार परम व गोवर्धन यांना पळवून नेलेले असते. राजेंद्रसिंहांनी नादानसिंहाचा कट्टर शत्रू असणाऱ्या डाकू मानसिंग याच्या हद्दीत जोहड बांधल्याने त्या भागात सुबत्ता आली होती. त्यामुळे नादानसिंह चिडतो व त्या दोघांचे अपहरण करतो. राजेंद्रसिंह सोडवण्यास जातो तेव्हा नादानसिंह म्हणतो, ''... येताना पिस्तुल, चाकू काहीदेखील आणायचे नाही. अगदी डंडादेखील नाही. जर दगाफटका करण्याचा प्रयत्न केलात तर गोळी घालीन. कबूल असेल तर या म्हणावं.''[३१]

राजेंद्रसिंह त्याला भेटायला जातात व त्याला सांगतात, ''... नादानसिंह, तू पुन्हा एकदा नवं आयुष्य सुरु कर. बंदूक टाकून नांगर धर. आमचा 'तरुण भारत संघ' तुला मदत करील. या तुझ्या साथीदाराशी ही बोल, बायकोशी बोल, स्वत:च्या कष्टातून मिळालेलं

सुखाचं जीवन जग.''[३२] हे एकून त्याच्याठिकाणी सर्वसामान्य माणसाप्रमाणे जीवन जगण्याची इच्छा जागृत होते. नादानसिंह तिसऱ्याच दिवशी सर्व साथीदाराबरोबर नवे जीवन स्वीकारण्याची शपथ घेतो. नरकापेक्षाही वाईट, कलंकित असणारे जीवन सोडून आनंदी जीवन जगू पाहतो.

डाकू नादानसिंहाने व त्याच्या इतर साथीदारांनी बंदुका टाकून जोहड बांधण्यासाठी हातात कुदळी घेतल्या. डाकूनादानसिंहांचा नादानसिंह होतो. डाकूगिरीमुळे आजूबाजूच्या लोकांना होणारा त्रासही कमी होतो व तो स्वत: एक चांगला नागरिक म्हणून जगतो, अशी नादानसिंहाची व्यक्तिरेखा 'जोहड' मध्ये आली आहे.

**जोधपूरचे महाराजा गजसिंह**

जोधपूरचे संस्थान खालसा झाल्यामुळे महाराजा गजसिंहांची राजवट संपते. तरीही तेथील लोकांविषयीची आत्मीयता त्याच्या अंत:करणात असते. त्यांचे कल्याण व्हावे अशी त्याची इच्छा असते. त्यामुळे जोधपूरचे महाराजा गजसिंह राजेंद्रसिहांना आमंत्रित करतात. आपला भाग पाणीटंचाईपासून मुक्त करावा, अशी इच्छा प्रकट करतात. ते म्हणतात ''माझा मारवाड पाणीटंचाईपासून मुक्त झाला पाहिजे. ही भूमी यापुढे पाण्यावाचून वंचित राहू नये, इथल्या माणसांना प्यायला, शेतीसाठी पाणी मिळायला पाहिजे, अशी माझी उत्कट इच्छा आहे. राजेंद्रसिंहजी, आपण याच राजस्थानात हा चमत्कार घडवलाय. म्हणूनच आम्ही आपणास आमंत्रित केले आहे. माझ्या मारवाडातही तुम्ही हे करा, आम्ही सर्व प्रकारची मदत करु.''[३३] यावरुन महाराजा गजसिंह यांचे अंत:करण उदार असल्याचे दिसते. ते समाजसेवी व्यक्तींची संस्थेच्या प्रतिनिधींची बैठक घेतात. स्वत: पायी चालत जावून गावोगावी, खेडोपाडी पाण्याच्या प्रश्नावर उद्‌बोधन करतात. रणरणत्या वाळवंटातून, रखरखीत उन्हातून चालत जाणे त्यांना माहित नसते तरीही गोरगरिबांच्यात मिसळतात. त्यांनी प्रेमाने, आदराने दिलेले मडक्यातील पाणी पितात. गरीब श्रीमंत असे न मानता सर्वांना पाणी प्रश्नासंबंधी जागृत करतात. त्यामुळे अनेक जोहड बांधले जातात, गावे पाणीटंचाईपासून मुक्त होतात.

महाराजा गजसिंह राजेंद्रसिंहांना वाढदिवसाचे अगत्याचे निमंत्रण देतात. राजेंद्रसिंहांनी जोहड बांधल्यामुळेच गावे पाणीटंचाईपासून मुक्त झाली होती. राजेंद्रसिंह आकाशासारखे

उदात्त हृदय असणाऱ्या व्यक्तीचा आग्रह नाकारु शकत नाहीत. राजेंद्रसिंहांच्या गळ्यात पुष्पहार घालून स्वागत करतात. स्वतःच्या चोपन्नाव्या वाढदिवशी राजेंद्रसिंहांना मानाचे महावस्त्र, सिरपावा व मानपत्र देऊन सत्कार करतात. गजसिंह राजेंद्रसिंहांना स्नेहभराने आलिंगन देतात.

जनकल्याण करणारा, प्रजेचे हित पहाणारा प्रत्यक्ष कार्यकरणारा, सत्कार्याची कदर करणारा, गोरगरिबांना साह्य करणाऱ्या लोकराजाची व्यक्तिरेखा या कादंबरीत सुरेखा शहा यांनी रेखाटली आहे.

**इतर व्यक्तिरेखा**

कादंबरीच्या कथानकाला सलगता येण्यासाठी व प्रमुख व्यक्तिरेखांना उठावदारपणा प्राप्त होण्यासाठी या व्यक्तिरेखा आलेल्या असतात. कादंबरीच्या कथानकात मात्र यांना महत्त्वाचे स्थान नसते. कथानकाला आकार येण्यासाठी या व्यक्तिरेखा वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. या व्यक्तिरेखांमुळे कादंबरीचे कथानक गुंफले जाते. या व्यक्तिरेखा आदिवासी भागातील, बदलत्या जीवनातील, माणसांच्या कर्तृत्वाच्या विविध नमुन्याच्या आहेत. या व्यक्तिरेखा पुढीलप्रमाणे अभ्यासता येतात.

**जंबुरी**

कजौडीला आधार देणारी जंबुरी ही तरुणपणीच विधवा झालेली असते. हिंमतीने एकटेच जगायची. नेहमी कजौडीला साथ द्यायची अशा वृत्तीची ती असते. टंचाई असल्यामुळे स्त्रिया नेहमी पाण्याच्याच विषयावर बोलत. पाण्यासाठी जंबुरी व इतर स्त्रियांना वणवण भटकावे लागते. जंबुरीला पूर्वीचे दिवस आठवतात. जंबुरी म्हणते, "आमच्या वेळी असं नव्हतं बघ ! कसेल तसं, मेहनत करील तेवढं मिळायचं. दारापुढे गुरं असायची, भरपूर दूधदुभतं व्हायचं, पोराबाळांना दूध प्यायला मिळायचं, तूप विकून पैसे मिळायचे. दर आठा दिवसानी चांगल शेरभर तूप व्हायचं..."[३४] या विचाराने ती सुखावते. पण तिला चालू काळ लक्षात येतो. पाण्यासाठी मैलमैल चालावे लागते हे ही कळते. गावात एकाच ठिकाणी पाणी

असते. तेही जास्त नसते. पाणी आळीपाळीने काढावे लागे. त्या खोल विहिरीत रस्सीने घागर सोडल्यास घोटभर पाणी वरती यायचे, अशी त्या विहिरीची अवस्था होती.

जंबुरी, कजौडी, जमना पाण्यासाठी निघाल्या असता काही तरुण त्यांच्या दृष्टीस पडतात. मुलं पळवणारी टोळी असेल असे त्यांना वाटते. जंबुरी कजौडीच्या मुलांचे संरक्षण व्हावे म्हणून घरी जाते. ती मुलांकडे जात असताना तिच्या पाठीमागून तरुण येतात तेव्हा जंबुरीला भीती वाटते. ती कजौडीच्या झोपडीत शिरते व त्या मुलांना उचलून घेते. जंबुरीवर त्या मुलांची जबाबदारी सोपवली असल्याने ती घाबरुन म्हणते, ''अरे अरे, हे काय करताय तुम्ही ? आं ऽ ऽ आमची पोरं पळवून नेता काय ?''[३५] मुलांना कॉलरा झाला असल्याने राजेंद्रसिंह त्यांना औषधोपचार करुन बरे करतात. जंबुरीचा त्या तरुणांवर विश्वास बसतो. जंबुरी राजेंद्रभैय्यांना जोहडच्या कामात कजौडी बरोबर मदत करायला तयार होते. आंतरिक उर्मीने जंबुरी राजेंद्रसिंहांना म्हणते ''अरे, पाहतोस काय असं खुळ्यासारखं, दे इकडे, मी किती काम करु शकते ते तुला आज दाखवते.''[३६] अशाप्रकारे प्रत्यक्ष काम करणारी, कर्तृत्वावर विश्वास असणारी जंबुरी मजुरी घ्यायला तयार होत नाही. तिला गावात मान होता. जंबुरीचा शब्द मोडण्याची ताकत कोणातही नव्हती. अशी व्यक्तिरेखा सुरेखा शहा यांनी 'जोहड' मध्ये रेखाटली आहे.

### राजेंद्रसिंहांचे वडील

राजेंद्रसिंहांचे वडील सुखवीरसिंह मेरठजवळील दौसा या गावचे जमीनदार असतात. जमीनदारीचा त्यांना मोठा गर्व होता. स्वभावाने रागीट असल्याने कुळांना ते गुलामासारखे वागवायचे. कुळांची स्थिती अतिशय बिकट त्यामुळे कुळं एवढे बोलून घेऊनही त्यांच्याकडेच काम करत त्यांची अशी परिस्थिती असूनही राजेंद्रसिंहांचे वडील नेहमी त्यांच्यावर ओरडत.

राजेंद्रसिंहांचे वडील कुळांना म्हणतात. ''काय रे ! फुकटखाऊ, कामचोरांनो, माजलात काय ? आं ! आमचा वाटा वेळेवर घालायला तुम्हाला काय होतंय ? बेमान कुणीकडचे. कुत्री तरी बरी तुमच्यापेक्षा, खाल्या भाकरीला तरी जागतात ती. खंड कधी देणार ते सांगा?''[३७] अशा प्रकारे नेहमी त्यांचा ते अपमान करत व आपल्या जमीनदारीचा,

श्रीमंतीचा, वर्चस्वाचा रुबाब त्यांच्यावर गाजवत. खालच्या लोकांच्या संगतीत राजेंद्रसिंहांनी गेलेले, खेळलेले त्यांना आवडत नसे. शाळेची फी ही राजेंद्रसिंहांना द्यायला ते गुन्हा समजत. हलक्या लोकांच्या संगतीत जर राजेंद्रसिंह दिसले तर त्यांचा राग गगनाला भिडे ''मुर्खा, घरात चल. या असल्या पोरांबरोबर सारखं काय खेळत असतोस ? जरा आपल्या लायकीची तरी बघावीत की नाही. नालायक कुठला?''[३८] असे नेहमी अपमानास्पद बोलत. त्यांच्या अशा स्वभावामुळे राजेंद्रसिंहांना त्यांच्याविषयी कधीही आपलेपणा वाटत नव्हता. नेहमी त्यांचा तिरस्कारच वाटे.

आईही वडिलांसमोर कधीच बोलत नसे. चूल आणि मूल या भोवतीच तिचे विश्व गुरफटलेले होते. तिला कोणताच निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते. पतीच्या बोलण्याप्रमाणे तिला वागावे लागत होते.

राजेंद्रसिंह ज्यावेळी घरातील सर्व वस्तू विकतात, नोकरीचा राजीनामा देतात व किशोरीला जाण्याचा निर्णय घेतात त्यावेळी 'कुळबुडव्या, नालायक'[३९] अशा ते शिव्या घालतात. अशी अहं स्वभावाची, श्रीमंतीचा गर्व, जमीनदारीचा अहंकार असलेली राजेंद्रसिंहांच्या वडिलांची व्यक्तिरेखा सुरेखा शहा यांनी 'जोहड' मध्ये रेखाटलेली दिसून येते.

**रामकली**

रामकली गाई - म्हैशी सांभाळून त्यांचे दूध विकून संसार सांभाळते. तिच्याकडे एक म्हैस व एक गाय असते. यावरच ती आपला उदरनिर्वाह करते. पाच सहा गायी-म्हैशी सांभाळून दूध डेअरी काढण्याचा प्रस्ताव राजेंद्रसिंह तिच्यापुढे मांडतात. रामकली म्हणते, ''पण पैसा कुठून आणणार ? आणि एवढ्या जनावरांचा चारा म्हणजे !''[४०] यावर राजेंद्रसिंह सांगतात ''बेहनजी, चांगल्या जातीच्या, भरपूर दूध देणाऱ्या गायी - म्हैशी आमचा 'तरूण भारत संघ' तुम्हाला आणून देईल. चाऱ्यासाठी पैसे कर्जाऊ देऊत. तुम्ही डेअरीला रोज दूध घालाल. त्यातले काही पैसे मोडून घेऊन त्यातून हळूहळू कर्ज फेडायचं. पैशाला व्याज नाही.''[४१]

रामकली हे ऐकून फार आनंदून जाते. ती स्वत: निर्णय घ्यायला लागते. नवऱ्याला म्हणजे रामजीला विचारणेही तिला महत्त्वाचे वाटत नाही. ती म्हणते, ''तुम्ही कर्ज देणार, कष्ट आम्ही करणार, कर्ज फेडणारही आम्हीच, मग नवऱ्याला विचारून तरी काय उपयोग?''[४२] तो रामजीकडे बघत बोलते. अशा जागृत रामकलीची व्यक्तिरेखा 'जोहड' मध्ये दिसून येते.

## रामजी

रामकलीला कामात मदत करणारा, प्रोत्साहन देणारा, गावच्या कामातही लक्ष घालणारा रामकलीचा नवरा म्हणजे रामजी. रामजीला व इतर गावकऱ्यांना शेणखत कसे तयार करायचे ? त्याचा वापर कशा पद्धतीने करायचा ? त्याचबरोबर प्रत्येकाच्या शेतात आलेले धान्य एकत्र ठेवायचे व ज्यावेळी धान्याची टंचाई भासेल त्यावेळी पूर्वीच्या दराने ते धान्य द्यायचे. यामुळे धान्याचा तुटवडा कधीही कुणालाही भासणार नाही, हे धान्य सुरक्षित साठवून ठेवण्याच्या पद्धतीला 'ग्रामकोष' म्हणतात. ही सर्व सविस्तर माहिती राजेंद्रसिंह रामजीला व इतर गावकऱ्यांना देतात. यावर रामजी म्हणतो, ''हा भैय्या, आता देवदयेने भरपूर पीक येतेय, तर तुमच्या सांगण्याप्रमाण करतो म्हणजे वर्षभर पोटाची काळजी नाही''[४३]

गावाचे हित पाहून गावाच्या कामाला साह्य करणाऱ्या रामजीची ही व्यक्तिरेखा 'जोहड' मध्ये महत्त्वाची मानता येते.

## रामप्यारी

रामप्यारी रामकलीच्या गावातील असल्याने राजेंद्रसिंहांच्या सर्व योजनांचा लाभ घेते. रामप्यारीकडे फक्त तीन शेळ्या असतात. पुढे म्हैशींचे भरपूर दूध विकून मिळणाऱ्या पैशातून आपण काय करायचे याचे ती स्वप्न पाहू लागते. बचत गटाची संकल्पना राजेंद्रसिंह तिच्या पुढे मांडतात. ही कल्पना रामप्यारीला व इतर स्त्रियांना आवडते.

दूध डेअरीचे नाव 'गोकुळ ठेवाचं की यशोदा मैय्या?' असे रामप्यारी इतर स्त्रियांना विचारते. 'गोकुळ' हे नाव डेअरीला देतात. राजेंद्रसिंह दुधात पाणी घालायचे नाही अशी

सक्त ताकीद देतात. रामप्यारी व इतर स्त्रिया त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागतात. कष्टाचा कंटाळा न करता अविरतपणे कष्ट करत राहणारी रामप्यारी व इतर स्त्रिया या कादंबरीत पहावयास मिळतात.

**राजेंद्रसिंहांची पत्नी मीना**

मीना ही राजेंद्रसिंहांची पत्नी. सर्वसामान्य विचारांची, चारचौघीसारखी, पतीकडून साध्यासुध्या अपेक्षा ठेवणारी असते. पतीच्या साथीने संसार करु पाहणारी मीना. नोकरीचा राजीनामा देऊन इतरांसाठी जगण्याचे राजेंद्रसिंह ठरवतात तेव्हा तिला ते मान्य होत नाही. ती माहेरी जाण्याचा निर्णय घेते. राजेंद्रसिंहांनी आदिवासी लोकांना दिलेले जीवनदान, त्यांच्यासाठी राबवलेले अनेक उपक्रम, दूरदृष्टीने केलेल्या त्या भागातील सोई-सुविधा, आदिवासी भागातील या परिवर्तनामुळे तिच्याही स्वभावात परिवर्तन होते. मीना म्हणते, ''मी तुमच्याजवळ आलेय, नेहमीसाठी. माझी चूक मला समजलीय. तुम्ही हे जे काम करता आहात, ते किती मौलिक आहे हे मला कळलंय. तुमचा मला अभिमान वाटतोय.''[४४] राजेंद्रसिंहांचा त्याग करणारी मीना आदरयुक्त बोलते. तिला पतीचा अभिमान वाटू लागतो. त्यांचे कर्तृत्व, त्यांचा त्याग, रखरखीत दुष्काळी भागाचे केलेले परिवर्तन, दूरदर्शीपणा, समर्पण हे सर्व अनुभवास येते तेव्हा राजेंद्रसिंहांना साथ द्यायला ती तयार होते. आपल्या पतीच्या मनात आपल्याविषयी असणारे अढळस्थान ती जाणते.

राजेंद्रसिंह काही काळच घरी असायचे त्यामुळे रेणू व मौलिकची सर्व जबाबदारी मीनावरच असते. आपले कर्तव्य जाणून घेऊन ती आईची भूमिका व्यवस्थितरित्या पार पाडते. पतीचा सहवासही दुर्मिळच, पण नवऱ्याच्या कर्तृत्वाने ती आनंदी होते. राजेंद्रसिंह घरी नसल्याने अनेक संकटांना व प्रसंगाना तिला धैर्याने सामोरे जावे लागते. राजेंद्रसिंह घरी नसताना अनेकांचे निरोप घेण्या-देण्याचे काम मीनालाच करावे लागे. पण मीनाची कधीही कोणत्याही बाबतीत तक्रार नव्हती. राजेंद्रसिंह जेव्हा घरी येत तेव्हा मीना त्यांच्या आवडीचा स्वयंपाक करीत असे.

पतीला साथ देणारी, मुलांना सांभाळणारी आईच्या व पत्नीच्या भूमिका पार पाडणारी, आवडीनिवडी पहाणारी, काळजी घेणारी मीनाची व्यक्तिरेखा आहे.

## राजेंद्रसिंहांची मुलगी रेणू

धाडसी, जिद्दी, वडिलाबद्दल अभिमान, आदर असणारी राजेंद्रसिंहांची मुलगी म्हणजे रेणू . राजेंद्रसिंह जेव्हा घरी येतील तेव्हा सर्व वेळ त्यांच्या सोबत घालवावे असे रेणूला वाटे. लहानपणीदेखील ती राजेंद्रसिंहांना क्षणभरही सोडत नसे. रडून ती गोंधळ घालायची. तिला चुकवून बाहेर जावे लागे. संध्याकाळ झाली की वाट बघत खिडकीत उभी असायची तिचे वडिलांवर खूप प्रेम होते.

तिच्या मैत्रिणींचे वडील डॉक्टर, इंजिनीअर, वकील, मोठे ऑफिसर, बिझनेसमन होते. रेणूचे पप्पा मात्र सर्वांहून वेगळे. त्यांना स्वत:च्या घरात रहायला सवड मिळत नसे. हजारो लोकांना जीवनदान देणारे, त्यांची घरे उभा करणारे हे सर्व ती जाणून होती. अनेकदा ती भिकमपूरला पप्पां बरोबर जाते. त्यांच्याबरोबर मनसोक्त फिरते तेथील जोहड, मोर, उंटांचे तांडे, शेतात डोलणारी पिके पाहायला तिला खूप आवडे. तेथील लोकांचे तिच्या वडिलांवर असलेले प्रेम, आपुलकी पाहून तिला त्यांचा अभिमान वाटे. रेणूला कलेक्टर होऊन पप्पांसारखी नि:स्वार्थीपणे लोकांची सेवा करावी वाटे.

राजेंद्रसिंहांना आवडणारी दुष्यंताच्या गझलांची कॅसेट दुर्मिळ असतानाही रेणू मिळवते व त्यांना भेट म्हणून देते. वडिलांच्या आवडीनिवडी जपणारी रेणू . रेणूच्या ठिकाणी असणारे वडिलांबद्दल प्रेम, आदर तिच्यावर झालेले चांगले संस्कार रेणूच्या व्यक्तिरेखेतून दिसून येतात.

## दाखडी

लिलुंडा गावामध्ये राहणारी स्त्री म्हणजे दाखडी. लिलुंडातील गावकरी जोहड बांधण्यास तयार होतात. परंतु दाखडी आपली कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त करत नाही. स्तब्ध राहते. ती जोहडच्या कामाला मदत करत नाही. काही दिवसांनी मात्र स्वत:ची चूक तिला कळल्यानंतर जोहडच्या कामाला मदत करायला येते. राजेंद्रभैय्यांना म्हणते ''भैय्या, मी आजपासून या कामावर येऊ का?''[४५] राजेंद्र भैय्या तिला माफ करतात. परंतु पहिल्यांदाच तिने जोहडच्या कामाला नकार दिल्याने दडकी माफ करत नाही. दडकी दाखडीचा अपमान

करते व तेथून जाण्यास सांगते. दाखडीला आपल्या निर्णयाचा पश्चाताप होतो. आलेल्या वाटेने रडत परत जाते.

### जयरामची आई

जख्खड म्हातारी होऊनही आपल्या मुलाच्या कामात जयरामची आई मदत करते. 'सत्तर – ऐंशी पावसाळे पाहिलेली ती बाई एखाद्या वटलेल्या झाडासारखी दिसे. परंतु अजूनपर्यंत तिला कसलाही आजार माहीती नव्हता. तिला जंगलातल्या वनौषधींची, जडीबुटींची खूप माहिती होती. घरातल्यांना कसलाही आजार झाला की, म्हातारी जंगलातली हवी ती पाने, मुळ्या घेऊन येई आणि त्याचा काढा करुन देई लागलीच गुण येई.'[४६] सर्व औषधी वनस्पतींची माहिती तिला होती.

सून प्रेमली अथवा गावातील इतर कोणीही आजारी पडल्यास औषधासाठी तिच्याकडे येतात. अनेक वनौषधी वनस्पती जयरामच्या आईला माहीत असल्याने वनौषधी वनस्पतींची माहिती देण्याची विनंती राजेंद्रसिंह जयरामच्या आईकडे करतात. तेथील वृद्ध व्यक्ती सहसा आपले ज्ञान दुसऱ्याला सांगायला तयार होत नसत. राजेंद्रसिंहाच्या विनंतीस मात्र मान देऊन ती सांगण्यास तयार होते. राजेंद्रसिंह गुर्जर, मीणा, बलाई या आदिवासी लोकांना वनौषधी वनस्पतींचा परिचय व्हावा म्हणून सर्वांना जयरामच्या आईबरोबर जंगलात घेऊन जातात.

चंद्रहास बेल याचा उपयोग ताप, उलटी, जुलाब, खोकला, कोड, यावर सिंदुवार याला सिंभाळू ही म्हणतात याच्या रसाने केस वाढतात, नजर सुधारते, सूज कमी येते. तर कुरंड, सहदेवी, बावली, काकनाशा, भृंगराज, हिंगोट, नील या व अशा कितीतरी वनस्पतींचे औषधी गुण जयरामची आई सांगते. राजेंद्रसिंह आयुर्वेदाचे डॉक्टर असल्याने त्यांनाही औषधी वनस्पती माहीत होत्या. या औषधी वनस्पतींचे उपयोग सर्वजन अतिशय उत्सुकतेने ऐकतात. अशाप्रकारे अनेक औषधी वनस्पतींची माहिती असणारे चालते बोलते वैद्यकीय केंद्र असणाऱ्या जयरामच्या आईची व्यक्तिरेखा 'जोहड' मध्ये येते.

### सुलेमान

सरिस्का जंगलात बेकायदेशीर शिकार, वृक्षतोड, खाणी सुरु करणारा सुलेमान 'जोहड' मध्ये येतो. रात्रीचे पाणी पिण्यासाठी वाघ आले असता त्यांची शिकार सुलेमान करतो. वाघांच्या कातडीची, दातांची, चरबीची चांगली कमाई होत असल्याने सुलेमानने अनेक वाघांचा प्राण त्याने घेतलेला असतो.

नमाजसाठी सुलेमान गेला असता तिथे राजेंद्रसिंह सुलेमानला भेटायला येतात. सुलेमानला आपण केलेल्या अनेक गैरकृत्यांची आठवण राजेंद्रसिंहांना पाहून होते. सरिस्का जंगलातील वनस्पती व प्राणी किती महत्त्वाचे आहेत हे राजेंद्रसिंह सुलेमानला समजावून सांगतात. स्वत: केलेल्या कृत्यांचा त्याला अपमान वाटू लागतो. सुलेमानमध्ये परिवर्तन होते. तो म्हणतो, ''साहेब, मी माझ्या बालबच्च्यांची कसम घेऊन सांगतो की, यापुढे मी शिकार करणार नाही.''[४७] चुकीची त्याला जाणीव होते, तो पूर्णपणे बदलतो व जंगल संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर घेतो.

### बन्सीचाचा

बन्सीचाचाचे शेत अरवरी नदीला लागून असते. पन्नास-पंचावन्न वर्षात तेथे पाणी नसल्याने शेतातून काहीच उत्पन्न निघायचे नाही. सुखाचे दिवस आयुष्यात आलेच नव्हते. पाणी नसल्याने बन्सीचाचाची मुलेदेखील कामधंद्यासाठी परगावी जातात. गेल्या तीन वर्षात राजेंद्रसिंहांच्या मार्गदर्शनाखाली अनेक जोहड बांधल्याने अरवरी नदीला पाणी येते. शेतात भरपूर पीक येते परगावी गेलेले लोक परत येतात. लोक आनंदून जातात.

बन्सीचाचा शेतात गेले असता त्यांना मन्नूलाल ठेकेदार नदीतील मासे पकडण्यासाठी आलेला दिसतो. ठेकेदाराने पैसे घेऊन मासे पकडण्याचा ठेका घेतला होता. हे ऐकून बन्सीचाचा भडकतो व गावकऱ्यांना घेऊन नदीवर येतो. बन्सीचाचा व गावकरी मासे पकडू देत नाहीत 'जलचर बचाओ, ठेकेदार वापस जाओ' अशा घोषणा होऊ लागतात. ठेकेदार संतापतो. बन्सीचाचा म्हणतात, ''जा रे जा, आम्ही भीत नाही तुला आणि तुझ्या त्या लाचखाऊ हॉफिसरला.''[४८] बन्सीचाचा व गावकरी एक होतात ही मच्छीमार थांबवायचे

ठरवतात. कुणालाही मासे पकडू द्यायचे नाहीत असे बन्सीचाचा व गावकऱ्यांनी ठरविले होते.

या गरीब लोकांनी रात्रंदिवस काम करुन अरवरी नदीला पुनर्जन्म दिला होता. त्याचा फायदा घ्यायला ठेकेदारासारखे लोक टपले होते. ही आमची नदी आहे. तिच्यावर आमचा हक्क आहे. या नदीतील जिवांचे संरक्षण करणे हे आमचे कर्तव्य आहे असे बन्सीचाचा व गावकरी सांगतात. ठेकेदार अधिकाऱ्यांसह घेऊन येतो तरीही गावकरी नमत नाहीत. तो अधिकारी नदीत अेंड्रीन ओततो. सर्व मासे मरतात. सर्व लोक संतापतात. एक दक्ष गावकरी म्हणून बन्सीचाचाची व्यक्तिरेखा या कादंबरीत पहाता येते.

### हरिरामजी

तीन-चार मणापेक्षा जास्त बाजरी न पिकणाऱ्या हरिरामच्या शेतात तीस-चाळीस मण बाजरी जोहड तलाव बांधल्यामुळे होऊ लागते. पूर्वी खायलाही मिळत नव्हते. परंतु आता शेतात भरपूर धान्य व्हायला लागते. हरिराम राजेंद्रसिंहाना छोटीसी भेट म्हणून बाजरीचे पोते आश्रमासाठी देतो. हरिरामला खूप आनंद होतो 'हरिरामचा चेहरा उजळला होता. तो प्रकाश कोणत्याही दिव्यापेक्षा तेजस्वी होता. कारण तो त्याच्या मनाचा होता. अंत:करणातील आनंदाचा होता.'[४९] तो राजेंद्रसिंहांचे आभार मानत होता कारण हरिरामजीला त्यांच्यामुळेच हे दिवस पाहता आले होते.

### राधू पटेल

'निंबी' या गावात राहणारा राधू पटेल, उंचापुरा, बेरकी वाटणाऱ्या डोळ्यांचा, नाकेला. मूळचा गौरवर्ण उन्हात रापून तांब्यासारखा झालेला राधू पटेल. याला राजेंद्रसिंहांना भेटल्याशिवाय चैन पडत नसे. राधूच्या भागात राजेंद्रभैय्यांनी जोहड बांधल्याने पाण्याची कमतरता भासत नव्हती. त्याच्याकडे पन्नास-साठ दुभत्या म्हैशी होत्या. चार-पाचशे लिटर दूध डेअरीत घालत होता. पंचवीस एकर शेती होती. त्याला सात मुलगे व एक मुलगी होती. सर्वजण मिळून शेती करत. पूर्वी खायला अन्नही नव्हते परंतु आता घरात दूधतुपाची,

धान्याची कमतरता नव्हती. सर्वजण कष्ट करुन आनंदाने एकत्र राहत होते. राधू पटेलला राजेंद्रभैय्या भेटले नाहीत म्हणून नाराज होतो. त्यांना आपले दैवत मानतो.

**समारोप :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रमुख व्यक्तिरेखाबरोबरच इतर छोट्या-मोठ्या व्यक्तिरेखा आल्या आहेत. या वेगवेगळ्या व्यक्तिरेखांचे अस्तित्व कादंबरीभर पाहायला मिळते. यापैकी काही ठराविक व्यक्तिरेखा वाचकांच्या मनात जास्त वेळ रेंगाळतात. या व्यक्तीरेखा विशिष्ट भूप्रदेशातील आहेत त्याचा प्रत्यय आपल्याला 'जोहड' मध्ये येतो. व्यक्ती आणि राजस्थानमधील प्रदेश यांच्या मध्ये असलेला जिवंत आंतरिक संबंध प्रत्ययकारी रीतीने या कादंबरीत चित्रित केलेला आहे.

'जोहड' मधील नायक उदात्त मनोवृत्तीचा, कर्तृत्ववान व प्रभावशाली आहे. सुरेखा शहांनी 'जोहड' मध्ये राजस्थान मधील पाणीटंचाईबरोबर इतरही प्रश्न मांडले आहेत. 'जोहड' मध्ये ज्शी सद्प्रवृत्तीची माणसे आहेत तशी दुष्ट प्रवृत्तीची ही माणसे आहेत. अशा स्वभावांचे विविध नमुने कादंबरीत रेखाटलेली आहेत.

कादंबरीतील व्यक्तिरेखासह त्यातल्या संघर्षाचे एक सम्यक आकलन आतापर्यंत करुन घेतले आहे. त्यातून मुख्यत: असे लक्षात येते की, स्वातंत्र्य मिळाले तरीही राजस्थानमधील् लोकांचे जीवन बदललेले दिसत नाही किंवा कोणत्याही योजना त्यांच्यापर्यंत पोहचलेल्या नाहीत परंतु राजेंद्रसिंहांच्या आगमनाने सर्व सोयीसुविधा त्यांना उपलब्ध होतात.

राजेंद्रसिंह ही या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. ग्रामीण समाजाला सहकार्य करण्याची त्यांची भावना असलेली दिसते. हे ग्रामीण लोक कोणतीही खोटी प्रतिष्ठा बाळगत नाहीत. राजेंद्रसिंह आपले ऐश्वर्यसंपन्न जीवन सोडून या लोकांसाठी जगतात. गावकऱ्यांच्यात एकी निर्माण करतात.

कादंबरीतील काही व्यक्तिरेखा महत्त्वाच्या आहेत. या व्यक्तिचित्रणांमुळे कादंबरीच्या कथानकाला उठावदारपणा आलेला दिसतो. या व्यक्तींच्या स्वभावाची विविध वैशिष्ट्ये

जाणवतात. राजेंद्रसिंह, कजौडी, जंबुरी, झुमा, मांगू पटेल, जयराम मीणा यासारख्या व्यक्तिरेखांचा प्रामुख्याने विचार येथे करता येतो. या शिवाय तंत्रज्ञानाची कोणतीही पदवी न घेता जोहडचे काम उत्कृष्टपणे पार पाडणारे गोवर्धन व परम, झाडांचा रस आमच्या नसानसातून वाहणाऱ्या रक्तासारखा आहे असे म्हणणारा सोमू, नादानसिंहांचा कट्टर शत्रू असणारा डाकू मानसिंग, रामावर अतूट श्रद्धा असल्याने रामपाठाचे आयोजन करणारे बरदू मीणा व प्रेमाराम, जबरदस्तीने गावकऱ्यांकडून धान्य, तूप, पैसे घेणारे राजेंद्रसिंहांवर, दगडफेक करणारे मंगलसिंग व दिलीपसिंग, शेतात खूप पीक आल्याने आनंदी झालेला धन्ना, ठेकेदार मन्नूलाल, 'तरुण भारत संघा'चा कार्यकर्ता व राजेंद्रसिंहांच्या गाडीची ड्रायव्हिंग करणारा राकेश, खाणींच्या मालकाविरुद्ध लढा द्यायला तयार होणारे हरिलालजी, धराडीच्या संमेलनात स्वत:हून वृक्षांची माहिती सांगणारे बजरंग मीण, अरवरीचा पुनर्जन्म व्हावा म्हणून जोहड बांधण्यासाठी स्वच्छेने जमीन देणारे रुढमल मीणा, 'तरूण भारत संघा'साठी आपली भिकमपुऱ्यातील जागा देणारे सुरतगढचा सुमेरसिंह अशा अनेक व्यक्तिरेखांनी कादंबरी व्यापून गेली आहे. जशा चांगल्या प्रवृत्तीच्या व्यक्ती भेटतात त्याप्रमाणे दृष्टप्रवृत्तीच्या व्यक्तीही भेटतात. नादानसिंहांसारखा डाकू, सुलेमान सारखा भ्रष्ट अधिकारी, पाण्यात अेंड्रेल ओतून मासे मारणारा दुष्ट अधिकारी, तरीही राजेंद्रसिंह हार न मानता त्याच्याशी लढत राहतात. त्यांच्यात परिवर्तन करतात. राजेंद्रसिंहांच्या व्यक्तीमत्त्वाचे बारीक-सारीक बारकावे लेखिकेने वाचकांच्यासमोर मांडले आहेत. व्यक्तीच्या दिसण्याचे दर्शन ते ज्याप्रमाणे घडवितात त्याचप्रमाणे व्यक्तींच्या जीवनानुभवातून त्यांच्या स्वभावाचे दर्शनही घडवितात. 'जोहड' मधील सर्व व्यक्तिरेखा जिवंत, ठसठशीत आणि वाचकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहणाऱ्या आहेत.

थोडक्यात असे म्हणता येईल की 'जोहड' या चरित कादंबरीचा प्रमुख नायक राजेंद्रसिंह हा त्याग, समर्पण, समाजसेवा ही उदात्त विचारसरणी अवलंबणारा नायक आहे. त्याला स्वत:च्या कार्याची जाण आहे. सामाजिक कार्य पार पाडण्यासाठी धडपडताना दिसतो. दु:ख भोगणारी, असाह्य झालेली काही पात्रे कादंबरीत येतात. या कादंबरीमधील व्यक्तिरेखा कथानकाच्या गतीमानतेशी जुळणाऱ्या आहेत. तसेच काही पात्रांची भाषा ही

राजस्थानी बोलीभाषा आहे. राजेंद्रसिंहांची व्यक्तिरेखा ज्याप्रमाणे 'जोहड' या कादंबरीमध्ये स्पष्ट होते त्याप्रमाणे इतर व्यक्तिरेखा होत नाहीत. एका महापुरुषाची व्यक्तिरेखा वैशिष्ट्यपूर्ण प्रसंगातून सुरेखा शहानी जिवंत केली आहे. 'जोहड' या कादंबरीमधील राजेंद्रसिंहांना व तेथील आदिवासी व्यक्तींना विपरित परिस्थितीशी झुंजावे लागते. या व्यक्तिरेखांचे वैविध्यपूर्ण चित्रण हे सुरेखा शहांच्या व्यक्तिरेखाचित्रणाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १ | सुनीता | : | 'समकालीन भारतीय साहित्य' : साहित्य अकादमी की द्विमासिक पत्रिका, वर्ष २४ अंक १०९, सितंबर – अक्तूबर २००३, पृ. १६० |
| २ | शहा सुरेखा | : | 'जोहड' सुमेरू प्रकाशन, डोंबिवली,तृतीय आवृत्ती, डिसेंबर २००३, पृ. ४८ |
| ३ | तत्रैव | : | पृ. २० |
| ४ | तत्रैव | : | पृ. १२ |
| ५ | तत्रैव | : | पृ. १२ |
| ६ | तत्रैव | : | पृ. १४ |
| ७ | तत्रैव | : | पृ. ३१ |
| ८ | तत्रैव | : | पृ. ३५ |
| ९ | तत्रैव | : | पृ. ७७ |
| १० | तत्रैव | : | पृ. २२२ |
| ११ | फडकुले निर्मलकुमार | : | दै. सकाळ', सोलापूर, मंगळवार, १८ जून, २००२, पृ. ६ |
| १२ | शहा सुरेखा | : | उनि पृ. ३ |
| १३ | तत्रैव | : | पृ. ९ |
| १४ | तत्रैव | : | पृ. ३६ |
| १५ | तत्रैव | : | पृ. १८९ |
| १६ | तत्रैव | : | पृ. ५२ |
| १७ | तत्रैव | : | पृ. ५३ |
| १८ | तत्रैव | : | पृ. ५५ |

| | | |
|---|---|---|
| १९ | तत्रैव | : पृ. ५३ |
| २० | तत्रैव | : पृ. ४६ |
| २१ | तत्रैव | : पृ. ३८ |
| २२ | तत्रैव | : पृ. ३८ |
| २३ | तत्रैव | : पृ. ११९ |
| २४ | तत्रैव | : पृ. १२७ |
| २५ | तत्रैव | : पृ. १२७,१२८ |
| २६ | तत्रैव | : पृ. ७८ |
| २७ | तत्रैव | : पृ. ७३ |
| २८ | तत्रैव | : पृ. ८० |
| २९ | तत्रैव | : पृ. १४२ |
| ३० | तत्रैव | : पृ. १४४ |
| ३१ | तत्रैव | : पृ. १४१ |
| ३२ | तत्रैव | : पृ. १४४ |
| ३३ | तत्रैव | : पृ. १९८ |
| ३४ | तत्रैव | : पृ. ५ |
| ३५ | तत्रैव | : पृ. २३ |
| ३६ | तत्रैव | : पृ. ३४ |
| ३७ | तत्रैव | : पृ. ४४ |
| ३८ | तत्रैव | : पृ. ४३ |
| ३९ | तत्रैव | : पृ. ५० |
| ४० | तत्रैव | : पृ. ९० |
| ४१ | तत्रैव | : पृ. ९० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४२ | तत्रैव | : | पृ. ९१ |
| ४३ | तत्रैव | : | पृ. ९३ |
| ४४ | तत्रैव | : | पृ. ९५,९६ |
| ४५ | तत्रैव | : | पृ. ५९ |
| ४६ | तत्रैव | : | पृ. ६९ |
| ४७ | तत्रैव | : | पृ. ८६ |
| ४८ | तत्रैव | : | पृ. १६८ |
| ४९ | तत्रैव | : | पृ. १३९ |